# केंद्राने कांदा निर्यातीवरील २०% शुल्क हटवले



**नवी दिल्ली :** भारत सरकारने कांदा निर्यातीवरील २०% शुल्क मागे घेतले आहे. १ एप्रिलपासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. महसूल विभागाने शनिवारी (दि. २२) या संदर्भातील अधिसूचना जारी केली. कांद्याची देशांतर्गत उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी सरकारने ८ डिसेंबर २०२३ ते ३ मे २०२४पर्यंत पाच महिन्यांसाठी शुल्क, किमान निर्यात किंमत आणि निर्यात बंदी याद्वारे निर्यात नियंत्रित करण्यासाठी उपाययोजना केल्या होत्या. १३ सप्टेंबर २०२४पासून २०% निर्यात शुल्क लागू केले होते. दरम्यान, निर्यात बंदी असूनही आर्थिक वर्ष २०२३-२४मध्ये कांद्याची निर्यात १७.१७ लाख मेट्रिक टन आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ (१८ मार्चपर्यंत) ११.६५ लाख मेट्रिक टन होती. सप्टेंबर २०२४मध्ये कांदा निर्यातीचे मासिक प्रमाण ०.७२ लाख मेट्रिक टन होते. ते जानेवारी २०२५मध्ये १.८५ लाख मेट्रिक टनपर्यंत वाढले आहे.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २४५

www.ramprahar.com

रविवार, २३ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


'दिव्यांग, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी एप्रिलमध्ये बैठक'/२

'रविप्रहर'मध्ये विविध विषयांवरील लेख/४

नॅशनल मेरीटाइम गेम्सचा आज शुभारंभ/८


# दंगलखोरांकडून नुकसानीची वसुली करणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नागपुरात माहिती

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर दंगलीमधील एकालाही सोडले जाणार नाही. जे काही नुकसान झालेले आहे ते सगळे दंगेखोरांकडून वसूल करण्यात येईल. दंगेखोरांनी ते पैसे भरले नाहीत, तर त्यांची संपत्ती विकली जाईल. नागपूरमध्ये किंवा महाराष्ट्रात कुठेही या गोष्टी सहन केल्या जाणार नाहीत, असा इशारा मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिला आहे.

नागपूरमध्ये सोमवारी हिंसाचार उफाळला होता. दगडफेक व जाळपोळीच्या घटनेमुळे नागपूर होरपळून निघाले. पोलिसांकडून या प्रकरणात तत्काळ कारवाई करीत अनेकांना ताब्यात घेण्यात आले. याच अनुषंगाने शनिवारी (दि. २२) मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली नागपूर येथे कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केले.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नागपूरमधील घटनेच्या अनुषंगाने मुळातच काही गोष्टी सभागृहात स्पष्ट केल्या होत्या. औरंगजेबाची प्रतिकात्मक कबर सकाळी जाळण्यात आली. याबाबत पोलिसांनी तक्रार दाखल करून घेतली, मात्र प्रतिकात्मक कबर जाळत असताना कुराणच्या आयत लिहिलेली चादर जळाली, असा भ्रम तयार करून काही लोकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून अपप्रचार केला आणि त्यानंतर मोठ्या प्रमाणात जमाव तयार झाला. या जमावाने तोडफोड केली, गाड्या फोडल्या, लोकांवर हल्ला केला. पोलिसांनी जवळपास चार-पाच तासांत या दंगलीवर आवर घातला.

दंगेखोर १०४ लोकांना ओळखण्यात आले असून ९२ लोकांना अटक केली आहे. यामध्ये काही अल्पवयीन मुलांचाही समावेश आहे. सोशल मीडियाचे ट्रॅकिंग करून ही घटना घडावी म्हणून पोस्ट ज्यांनी केलीय त्या सर्वांना दंगेखोरांसोबत सहआरोपी केले जाणार आहे. भडकवणारे पॉस्टकास्ट, चुकीच्या पोस्ट टाकून अफवा पसरवून लोकांमध्ये भीती निर्माण केलेल्या लोकांवरही कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

काही निर्बंध घातले आहेत. त्यामुळे जनजीवनावर, व्यापारावर परिणाम होतोय. त्यात शिथिलता आणावी हा प्रयत्न आहे, मात्र कोणी दंगा करण्याचा प्रयत्न केला तर अतिशय कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिला.

### प्रशांत कोरटकरला पोलीस शोधून कारवाई करतील

छत्रपती शिवरायांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य आणि कोल्हापूरातील इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना जीवे मारण्याची धमकीप्रकरणी प्रशांत कोरटकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोरटकर दुबईला पळून गेल्याचा दावा करण्यात येत आहे. याबाबतच्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, कोणतीही शहानिशा न करता बातम्या चालवल्या जात आहेत. मी तुम्हाला सांगतो तो दुबईला जावो की, अजून कुठेही जावो. पोलीस त्याला शोधून काढतील आणि त्याच्यावर कारवाई करतील.

# आदित्यचे नाव न घेण्यासाठी उद्धव ठाकरेंनी दोनदा फोन केला होता

## दिशा सालियन प्रकरणात खासदार नारायण राणेंचा गौप्यस्फोट

**मुंबई : प्रतिनिधी**

बॉलीवूडचा दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूतची मॅनेजर दिशा सालियन प्रकरणात शिवसेनेचे युवानेते, माजी मंत्री आदित्य ठाकरे पुन्हा अडचणीत आले आहेत. दिशावर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली असा दावा करीत तिच्या कुटुंबाने हायकोर्टात याचिका दाखल केली आहे. या प्रकरणी खासदार, माजी केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनीही आदित्यसाठी वडील माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचा दोनदा फोन आल्याचा दावा केला आहे.

भाजप कार्यालयात शनिवारी (दि. २२) घेतलेल्या पत्रकार परिषदेत खासदार नारायण राणे यांनी उद्धव ठाकरेंकडून आलेल्या फोनबाबतचा खुलासा केला. ते म्हणाले, मला आतापर्यंत उद्धव ठाकरेंनी दोनदा फोन केला. पहिल्यांदा फोन आला तेव्हा मी मुंबईतील जुहू येथील घरी जात होतो. वांद्रे क्रॉस केल्यानंतर मला मिलिंद नार्वेकरांचा फोन आला. दादा, साहेबांना बोलायचे, असे नार्वेकर म्हणाले. मी म्हटले कोण साहेब? ते म्हणाले, उद्धवजी. ते गाडी चालवत आहेत, त्यांना तुमच्याशी बोलायचे आहे. मी म्हणालो ठीक आहे.

उद्धव ठाकरेंनी फोन घेतल्यावर मी त्यांना जय महाराष्ट्र साहेब म्हणालो. त्यावर ते म्हणाले, तुम्ही अजूनही जय महाराष्ट्र बोलता? मी म्हटले, मरेपर्यंत बोलणार. ठाकरे पुढे म्हणाले, तुम्हाला मुलं आहेत, मलाही मुलं आहेत. सध्या जे प्रेसला बोलता, आदित्यचं नाव घेता आपण त्यामध्ये त्याचा उल्लेख करू नये, अशी विनंती उद्धव ठाकरे यांनी केल्याची माहिती खासदार राणेंनी दिली.



खासदार राणेंनी पुढे सांगितले, मी म्हणालो उद्धवजी एक गोष्ट लक्षात ठेवा एकतर मी अमुक ठिकाणी, अमुक याच्यात कोण आहे याचा उल्लेख केला नाही. निरपराध एका मुलीची हत्या झालीय, त्यामुळे हल्लेखोरांना अटक झाली आहे. त्यात तडजोड नाही. फक्त तुम्ही जे तुमच्या मुलाचे नाव घेतले तो संध्याकाळी जिथे जातो तिथे जाणे बरे नाही हे त्याला सांगा. जुहूला माझ्या घराजवळ दिनो मोरिया राहतो. त्याच्या घरात काय धुमाकूळ घालतात हे मला माहितेय, पण मी सांगणार नाही. त्यावर ते म्हणाले मी सांगतो त्याला, पण तुम्ही सहकार्य करा. मी म्हणालो ठीक आहे, असा संवाद झाल्याचे खासदार राणेंनी सांगितले.

खासदार नारायण राणेंनी दुसऱ्या फोनविषयीही माहिती दिली. ते म्हणाले, कोविड काळात दुसऱ्यांदा फोन आला. माझ्या रुग्णालयासाठी परवानगी घेण्याकरिता मी त्यांना फोन केला होता. रुग्णालयाला परवानगी मिळेलच असे ते म्हणाले, पण तुम्ही प्रेस घेता, तो उल्लेख टाळला तर बरं होईल, अशी ठाकरेंनी पुन्हा विनंती केली. त्यावर मी म्हणालो की, तुम्ही म्हणता त्याचे नाव मी घेतले नाही. मी फक्त बोललोय त्या घटनेवेळी एक मंत्री होता, असेही खासदार राणे यांनी या वेळी स्पष्ट केले.

### किशोरी पेडणेकरांकडून दबाव टाकला जातोय

किशोरी पेडणेकरांनी या प्रकरणात दिशाच्या आई-वडिलांवर का दडपण आणले, असा प्रश्न खासदार नारायण राणे यांनी या वेळी उपस्थित केला. आपण फक्त एक वाक्य बोलल्यानंतर पोलिसांनी आपल्याला अटक केली होती. दिशा सालियन प्रकरणात मुंबई पोलिसांनी पेडणेकरांवर कारवाई करावी, असेही ते म्हणाले.

# सहकारी गृहनिर्माण संस्थांचा स्वयंपुनर्विकास विषयावर आज पनवेलमध्ये मार्गदर्शन शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादित यांच्या विद्यमाने आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या सहकार्याने सहकारी गृहनिर्माण संस्थांचा इमारतींचा स्वयंपुनर्विकास या विषयावर मार्गदर्शनपर शिबिर आयोजित करण्यात आले आहे. हे शिबिर रविवारी (दि. २३) सकाळी १० वाजता पनवेल शहरातील विरूपाक्ष हॉल येथे होणार आहे.

या शिबिराला मार्गदर्शक म्हणून विधान परिषदेतील भाजप गटनेते आणि मुंबई बँकेचे अध्यक्ष प्रवीण दरेकर, आमदार प्रशांत ठाकूर, सहकारी संस्था पनवेल सहाय्यक निबंधक भारती काटूळे यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

गृहनिर्माण संस्था आणि रहिवाशांना स्वयंपुनर्विकासाच्या संकल्पनेची सखोल माहिती मिळावी, पुनर्विकास प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी, योजना आणि इतर विषयांवर या शिबिरात मार्गदर्शन होणार आहे. त्यामुळे शिबिराचा गृहनिर्माण संस्था व रहिवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादितचे अध्यक्ष कुंडलिक काटकर, सल्लागार व माजी नगरसेवक नितीन पाटील, सचिव भरत मोरे यांनी केले आहे.

# नागपूर हिंसाचारात जखमी झालेल्या एकाचा मृत्यू



**नागपूर : प्रतिनिधी**

नागपुरात सोमवारी दोन गटात उसळलेल्या हिंसाचारात इरफान अन्सारी (वय ३८, रा. गरीब नवाज नगर) या तरुणाचा मृत्यू झाला आहे. दंगलीच्या दिवशी इरफानला जमावाने मारहाण केल्यानंतर तो गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर मेयो रुग्णालयात उपचार सुरू होते. अखेर शनिवारी (दि. २२) त्याचा मृत्यू झाला.

दरम्यान, इरफानच्या मृत्यूची बातमी समोर येताच मेयो रुग्णालयासमोर मोठी गर्दी जमली. त्यामुळे रुग्णालयाबाहेर तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. यानंतर पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. याचबरोबर सशस्त्र जवानांनासुद्धा पाचारण करण्यात आले.

## निवडक

### आयपीएलचा थरार आता चाहत्यांसाठी मराठीतूनही!

**मुंबई :** क्रिकेट चाहत्यांसाठी पर्वणी असलेल्या आयपीएलची सुरुवात शनिवार (दि. २२) पासून झाली. मोठ्या दिमाखात या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा रंगला. यंदाच्या हंगामाचे वैशिष्ट्य म्हणजे प्रथमच जिओ टिव्हीने मराठी भाषेत कॉमेंट्री सुरू केली आहे. त्यामुळे या हंगामाचा थरार आता मराठी चाहत्यांना आपल्या मातृभाषेतून ऐकायला मिळणार आहे. या हंगामातील पहिली लढत केकेआर विरुद्ध आरसीबी अशी झाली. या सामन्यासाठी मराठमोळ्या केदार जाधवने प्रथमच मराठीतून कॉमेंट्री केली. त्याला ज्येष्ठ क्रिकेटपटू किरण मोरे यांची साथ लाभली आहे.

### ज्येष्ठ कवी विनोदकुमार शुक्ल यांना ज्ञानपीठ पुरस्कार जाहीर

**नवी दिल्ली :** हिंदीतील ज्येष्ठ कवी आणि साहित्यिक विनोदकुमार शुक्ल यांची यंदाच्या ज्ञानपीठ पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हा पुरस्कार भारतातील सर्वोच्च साहित्य सन्मान मानला जातो. नवी दिल्ली येथे शनिवारी (दि. २२) याबाबत अधिकृत घोषणा करण्यात आली.

# बीसीटी महाविद्यालयात राष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धा; मान्यवरांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयात शास्त्रार्थ या आशयाखाली राष्ट्रीय मूट कोर्ट स्पर्धा २१ ते २३ मार्चदरम्यान आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेत गोवा, बंगळुरू, चेन्नई, नागपूरसारख्या देशभरातील विविध विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आहे. स्पर्धेचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत झाले.





संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्घाटन समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश विजय अचलिया, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, कार्यकारी मंडळ सदस्य अर्चना ठाकूर, ॲड. विनायक कोळी, ॲड. राहुल घरत, प्राचार्य सानवी देशमुख आदी उपस्थित होते.



प्रमुख पाहुण्यांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या आणि अशा स्पर्धांचे कायदेशीर ज्ञान वृद्धीकरणात व भविष्यकाळातील कायदेशीर व्यावसायिक घडवण्यात असलेले महत्त्व अधोरेखित केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे स्पर्धकांना त्यांच्या कायदेशीर प्रवासात पुढे जाण्याची प्रेरणा मिळाली.

शास्त्रार्थ या राष्ट्रीय स्तराचे मूट कोर्ट स्पर्धेसाठी एक प्रतिष्ठित कायदेशीर तज्ज्ञांचे पॅनेल नियुक्त करण्यात आले आहे. सकाळच्या शिफ्टमध्ये न्यायाधीश म्हणून स्वप्नील पाटील, अश्विन सिंग, अश्विन आडवानी, वैभव घाटके, निलेश बागडे, सोनिया पवार, इंद्रजीत भोसले, भक्ती दळवी या वकिलांचा समावेश होता; तर दुपारच्या शिफ्टमध्ये न्यायाधीश म्हणून सुजय, लक्षणा पाट्याल, पूजा भोसले, सागर पसपोहे, शुभांगी झीटे, धनिष्ठा कावले, मोहनसिंग राजपूत, हृषिकेश वाणी या वकिलांचा समावेश होता. तत्पूर्वी २१ मार्च रोजी एक रिसर्चर टेस्टदेखील घेतली गेली, ज्यामुळे सहभागींना एक शैक्षणिक आव्हान दिले गेले आणि त्यांना आगामी कडक फेऱ्यांसाठी योग्यरीत्या तयार करण्यात आले. या स्पर्धेने वकिलांना त्यांची कौशल्ये सादर करण्यासाठी आणि कायदा क्षेत्रातील अमूल्य अनुभव मिळवण्यासाठी एक अनोखा मंच प्रदान केला गेला आहे.

कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक अपराजिता गुप्ता यांनी केले. या स्पर्धेत देशभरातील सहभागी स्पर्धक आपल्या वकिली कौशल्यांचे प्रदर्शन करीत असून युवा वकिलांना अमूल्य न्यायालयीन अनुभव मिळविण्याची, कायदेशीर व्यावसायिकांशी नेटवर्किंग करण्याची आणि राष्ट्रीय स्तरावर आपली प्रतिभा दाखवण्याची ही एक उत्तम संधी ठरली आहे.





**कोलकाता :** आयपीएलमध्ये शनिवारी गतविजेते कोलकाता नाईट रायडर्स आणि बंगळुरू रॉयल्स चॅलेंजर्स या संघांमध्ये सलामीची लढत रंगली. नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करणाऱ्या केकेआरकडून कर्णधार अजिंक्य रहाणे आणि सुनील नारायण या जोडीने तडाखेबंद फलंदाजी करीत दुसऱ्या गड्यासाठी दमदार भागीदारी रचली. अजिंक्यने चार षटकार व सहा चौकारांसह अर्धशतकी (३१ चेंडूत ५६ धावा) खेळी केली. केकेआरने निर्धारित २० षटकांत ८ बाद १७४ धावा केल्या होत्या.

# प्रशांत कोरटकरचा पासपोर्ट पत्नीकडून पोलिसांकडे जमा

**नागपूर : प्रतिनिधी**

इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकावणारा प्रशांत कोरटकर याचा पासपोर्ट त्याच्या पत्नीने शनिवारी (दि. २२) नागपुरात कोल्हापूर पोलिसांकडे जमा केला. यामुळे तो देशाबाहेर पळाला नसल्याचे स्पष्ट झाले.

प्रशांत कोरटकरचे दोन वर्षांपूर्वीचे कौटुंबिक सहलीचे दुबईमधील फोटो व्हायरल झाल्याने तो देशाबाहेर पळाल्याच्या चर्चा सुरू होत्या. याला अखेर पूर्णविराम मिळाला. कोरटकर याचा पासपोर्ट त्याच्या पत्नीने तपासासाठी नागपुरात असलेल्या कोल्हापूर पोलिसांकडे दिला. दरम्यान, चंद्रपूर जिल्ह्यात त्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# खोपोली बनतेय पर्यटन व आध्यात्मिक केंद्र


**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहर व परिसर औद्योगिक कारखाने व रोजगाराच्या संधींमुळे पूर्वीपासून औद्योगिक क्षेत्र म्हणून परिचित आहे. बदलत्या काळानुसार आता या शहराची ओळख औद्योगिकतेसोबतच पर्यटनस्थळ व आध्यात्मिक केंद्र म्हणूनही होत आहे.

खोपोली शहरातील ऐतिहासिक वीरेश्वर मंदिर, गगनगिरी महाराज अध्यात्मिक मठ, जवळील पळसदरी येथील स्वामी समर्थ मठ, मोगलवाडी रस्त्यावरील टेंबे स्वामी मठ, महड येथील अष्टविनायक देवस्थान ही धार्मिक व आध्यात्मिक ठिकाणे प्रसिद्ध आहेत. सोबत खंडाळा घाट व परिसरातील अद्भूत निसर्ग पर्यटनासाठी साद घालत आहे.









खोपोली परिसरातील ॲडलॅब इमॅजिका वॉटर आणि थीम पार्क आधुनिक पर्यटनाचे केंद्र बनले असून देशभरातील शालेय सहली व सर्व वयोगटातील पर्यटक येथे पर्यटनाचा आनंद घेण्यासाठी दाखल होतात. शनिवारी व रविवारी या सर्व ठिकाणी मोठ्या संख्येने राज्य व राज्याबाहेरीक पर्यटक येतात.

या विविध आध्यात्मिक, धार्मिक व आधुनिक स्थळांमुळे खोपोली शहर व परिसराचे आकर्षण दिवसेंदिवस वाढत आहे. या पार्श्वभूमीवर खोपोली नगरपालिका व येथील ग्रामपंचायतींकडून आधुनिक सोयीसुविधा निर्मितीचे कामे होत असल्याने परिसर प्रगतिपथावर आला आहे. महामार्ग, एक्स्प्रेस वे, लोकलसेवा, खोपोली नगरपालिकेसोबत नवी मुंबई, राज्य परिवहन विभाग अशा सर्व माध्यमातून भक्कम वाहतूक सेवा खोपोलीसाठी उपलब्ध असल्याने येण्या-जाण्यासाठी खोपोली सर्व बाजूने समृद्ध बनले आहे.

याशिवाय खोपोली शहराच्या भोवताली मोठ मोठे रिसॉर्ट, हॉटेल्स, राहण्याची व्यवस्था उपलब्ध असल्याने नागरिकांची पसंती मिळत आहे.

# दिव्यांग, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी एप्रिलमध्ये बैठक घेऊ -मुख्यमंत्री

## आंदोलनकर्ते बच्चू कडू यांना आश्वासन

**महाड : रामप्रहर वृत्त**

दिव्यांग, शेतकरी बांधवांच्या प्रश्नांसाठी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात बैठक घेऊन त्यावर मार्ग काढू, असे आश्वासन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माजी आमदार बच्चू कडू यांना दिले. कडू हे रायगड पायथ्याशी अन्नत्याग आंदोलनाला बसले आहेत. असे असले, तरी दिव्यांगांच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोवर अन्नत्याग आंदोलन सुरूच राहणार असल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले.



अन्नत्याग आंदोलनाला तब्बल ३० तास उलटल्यानंतर रायगडचे जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी भरत भासटेवाड आणि पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे यांनी आंदोलनस्थळी जाऊन बच्चू कडू यांची भेट घेतली. आंदोलन मागे घेण्याबाबत चर्चा केली. मात्र, बच्चू कडू आंदोलनावर ठाम राहिल्याने जिल्हाधिकारी जावळे यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. फडणवीस यांनी बच्चू कडू यांच्यासोबतही संवाद साधला. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते बच्चू कडू यांनी नारळपाणी प्यायले. दरम्यान, आंदोलन सुरूच राहणार असल्याने रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले रविवारी सकाळी १० वाजता आंदोलनस्थळी भेट देऊन बच्चू कडू यांच्याशी चर्चा करणार आहेत.

आपल्या अन्नत्याग आंदोलनासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली आहे. दिव्यांग, शेतकरी बांधवांच्या प्रश्नांबाबत सरकार सकारात्मक आहे. त्यांच्या न्याय्य मागण्यांवर चर्चेसाठी एप्रिलमध्ये बैठक घेऊन आणि त्यावर तोडगा काढू, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. त्यामुळे आपण हे आंदोलन मागे घ्यावे, अशी विनंती जिल्हाधिकाऱ्यांनी केली.

## जिते गावात भंगारच्या दुकानाला भीषण आग

**महाड : रामप्रहर वृत्त**

महाड एमआयडीसीमधील जिते गावच्या हद्दीत असणाऱ्या एका भंगारच्या दुकानाला भीषण आग लागली असून या आगीमध्ये संपूर्ण दुकान जळून खाक झाले आहे. शनिवारी (दि.२२) संध्याकाळी पाचच्या सुमारास हा धक्कादायक प्रकार घडला असून या दुकानात असणाऱ्या ड्रमचा स्फोटदेखील झाल्याची माहिती समोर येत आहे.



बाजूलाच जिते गाव असल्याने ही आग गावामध्ये घुसण्याची भीती निर्माण झाली आहे. प्रथमदर्शनी या ठिकाणी कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी भंगार दुकान पूर्णपणे जळून खाक झाले आहे, आग विझवण्यासाठी लक्ष्मी ऑरगॅनिक्स कंपनीची फायर ब्रिगेड, महाड एमआयडीसी फायर स्टेशनची फायर ब्रिगेड गाडी आणि प्रिव्ही ऑरगॅनिक कंपनीच्या फायर ब्रिकेटच्या गाडीने आग विझवण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले.

संपूर्ण महाड एमआयडीसी त्याचप्रमाणे महाड शहरामध्ये अनधिकृत वसलेल्या भंगारच्या दुकानांमध्ये असे प्रकार वारंवार घडत आहेत.

## श्रीवर्धनमध्ये बोगस डॉक्टरचा प्रताप

### गर्भवतीस दिले गर्भपाताचे औषध

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यात बोगस डॉक्टरांची संख्या वाढत चालली आहे. एक गंभीर प्रकरण २१ मार्च २०२५ रोजी समोर आले आहे, ज्यात एक बोगस डॉक्टर गर्भवती महिलेला गर्भपात करणारे औषध देत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

या प्रकरणात, शंकर रंगराव कुंभार या सीएमएस-ईडी कोर्स केलेल्या डॉक्टरने कुडगाव येथील रहिवासी जयवंती महेश भुवनेश्वर या गर्भवती महिलेला गर्भपात करण्यासाठी औषध दिले. या औषधामुळे महिलेच्या शरीरात अती रक्तस्राव होऊन तिच्या जीवाला धोका निर्माण झाला. त्या महिलेला त्वरित सरकारी रुग्णालयात उपचार दिले गेले आणि तिची स्थिती स्थिर झाली.

आरोपी शंकर कुंभार याने गर्भपाताचे औषध महिलेला दिले, यामुळे, सागरी पोलीस ठाण्यात त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणात नागरिकांना आवाहन करण्यात येते की गर्भधारणेच्या बाबतीत योग्य सल्ला आणि उपचार घेण्यासाठी केवळ प्रशिक्षित व प्रमाणित डॉक्टरांकडेच जावे. बोगस डॉक्टरांविरुद्ध तात्काळ कठोर कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यासाठी सरकारी यंत्रणा आणि वरिष्ठ अधिकारी त्वरित दखल घेतील, अशी आशा आहे.

## रोहा अर्बन बँकेची मुळ वास्तू कुणाला मिळू देणार नाही -खासदार तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

विनाकारण रोहा गैरसमज पसरवण्याचे काम सुरू आहे. रोहा अष्टमी अर्बन बँकेचा विषय चर्चेला जात असताना वास्तु खरेदीची निवेदी प्रक्रिया रद्द करण्याची राज्य सरकारकडून स्पष्ट भूमिका आहे. त्या खात्याचे मंत्री बाबासाहेब पाटील यांच्याशी चर्चा झाली आहे. जोपर्यंत माझी राजकीय ताकद आहे तोपर्यंत रोहा अर्बन बँकेची मुळ वास्तु कुणालाही मिळू देणार नाही, असे पत्रकार परिषदेत खासदार सुनील तटकरे यांनी सुतारवाडी येथे सांगितले या वेळी त्यांच्या समवेत माजी आमदार अनिकेत तटकरे उपस्थित होते.



या वेळेस सुनील तटकरे यांनी चाळीस वर्षे आम्ही राजकारण करत आहोत. निवडणूकीवर लक्ष ठेवून कधीही राजकारण केले नाही. रोह्याचा विकास हाच उद्दिष्ट ठेवून आम्ही काम केले आहे. मी स्वत: महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे व अनिकेत तटकरे यांच्या पाठपुराव्यामुळे रोहा कोलाड मार्ग झाला. सुरुवातीला काही लोकांनी डिव्हायडर नको म्हणून सांगितले. त्यामुळे डिव्हायडर रद्द केले होते. काही व्यापाऱ्यांच्या सहा आल्या, पुन्हा विचार बैठक झाली. या बैठकीत फेरविचार होऊन. डिव्हायडर करण्याचे सांगण्यात आले. दुर्दैवाने या डिव्हायडरमुळे एका तरुणाचा मृत्यू झाला. दुर्दैवाने झालेल्या या घटनेमुळे आमच्या मनात दुःख व संवेदना आहेत. या अपघाताची पोलीस चौकशी करण्यात येईल.

रोहा शहरातील हनुमान मंदिराचे काम हनुमान जयंतीच्या आधी पूर्ण होणार आहे. दुसरीकडे हनुमान टेकडी याचे कामाला सुरुवात होणार असून स्ट्रीट लाईट हेही होणार आहेत.

## शासनाच्या योजना सर्वांपर्यंत पोहचल्या पाहिजेत -संजय तवर

**मुरूड : प्रतिनिधी**

केंद्र व महाराष्ट्र शासनाच्या शेतकऱ्यांबरोबरच अन्य गोरगरीबांसाठी अनेक योजना कार्यान्वित आहेत या योजना शेवटच्या स्तरापर्यंत पोहचल्या पाहिजेत त्यासाठी शासनाच्या अधिकाऱ्यांना सहकार्य करा, असे आवाहन मुरूडचे नायब तहसीलदार संजय तवर यांनी मुरूड तालुक्यातील उसरोली येथील आगरी समाज सभागृहात आयोजित एका कार्यक्रमात बोलताना केले

केंद्रीय भूसंपादन विभाग, ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकारच्या मार्फत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० ह्या राज्यात राबविण्यात येत असलेल्या 'वॉटरशेड यात्रा'रथाचे पूजन व अन्य कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाच्या वतीने करण्यात आले होते. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

जागतिक वन दिनानिमित्त आयोजित या वॉटरशेड यात्रेचे उद्घाटन संजय तवर यांच्या हस्ते करण्यात आले. ४ जानेवारी २०२२ रोजी आयोजित पहिल्या राज्य स्तरीय नोडल यंत्रणेच्या सभेमध्ये रायगड जिल्ह्यातील सहा तालुक्यातील एकूण दहा प्रकल्पांना मान्यता मिळाली असून यात १०६ ग्रामपंचायती व २५४ गावातील उपचारिक क्षेत्र प्रस्तावित आहे. मुरूड तालुक्यातील नांदगाव, उसरोली, मजगाव, वेळास्ते व काशिद या पाच ग्रामपंचायतीं अंतर्गत सोळा गावे निवडण्यात आली आहेत.



या वेळी नांदगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सेजलताई घुमकर, उसरोलीचे माजी सरपंच मनिष नांदगावकर, मंडळ कृषी अधिकारी नरडे यांची भाषणे झाली. तर नरेंद्र चोरघे यांनी एक कविता सादर केली. सुगंधा दळवी, विद्याधर चोरघे, नरेंद्र चोरघे, यांची भजने तसेच मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांचे एक पथनाट्य व अन्य सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. तत्पूर्वी नांदगाव व उसरोली येथील पाणलोट मधील कामांचे लोकार्पण व वृक्षारोपण करण्यात आले तर उसरोली अमृत सरोवर येथे जलपूजन कार्यक्रम करण्यात आले. या वेळी उपस्थितांना मृद व जलसंवर्धनाची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उदय खोत सरांनी केले

कार्यक्रमाला उसरोलीचे माजी सरपंच महेश पाटील, नांदगावचे माजी उपसरपंच अस्लमभाई हलडे, ग्रामपंचायत सदस्य विक्रांत कुबल, उदय थळे, सदस्या मंजुम अप्पा घोले, वैशाली रणदिवे, रावजी, यशवंत पाटील, अरविंद शेडगे, अविनाश शिंदे, ग्रामसेवक प्रमोद म्हात्रे, केंद्र प्रमुख गालिब जनाब , महेंद्र चौलकर, उसरोली तलाठीआदी उपस्थित होते.

या वेळी या विभागातर्फे घेण्यात आलेल्या चित्रकला व निबंध लेखन स्पर्धेतील विजेत्या २७ विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमासाठी जलसंधारण अधिकारी सागर भोकटे, सौ. पाटील, नांदगावकर तसेच अनेक वॉटर शेड योध्दांनी मोठे सहकार्य केले.

## प्राथमिक शिक्षक संघाची राज्य कार्यकारी मंडळ सभा

**चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील ग्रामीण भागातील अनेक शाळा बंद करण्याचा शासनाच्या विचारधीन आहे. त्यामुळे राईट टू एज्युकेशन (आरटीई) शिक्षण हक्क कायद्यास छेद दिला जाणार आहे. यास विरोध म्हणून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या कार्यकारी सभेचे आयोजन यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे करण्यात आले होते.



या वेळी व्यासपीठावर ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, कोकण पदवीधर आमदार निरंजन डावखरे, आमदार प्रवीण स्वामी, केशवराव जाधव, माधवराव पाटील, राजाराम वरूटे ,राजेंद्र फुलावरे, राजेंद्र म्हात्रे, नितीन अहिरे यांच्यासह अनेक मान्यवर कार्यकारणी सभेस उपस्थित होते.

१५ मार्च २०२४ संच मान्यतेचा अन्यायकारक शासन निर्णयातील जाचक अटीत नक्कीच बदल करू असे आश्वासन ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

कोकण विभागीय पदवीधर आमदार निरंजन डावखरे साहेब यांनी शिक्षक संघाच्या पाठीशी मी कायम राहणार असून कुठलीही समस्या निर्माण झाल्यास संघाच्या कार्यकर्त्यांनी मला कधीही फोन करा मी सोडवण्यासाठी कटिबद्ध राहीन असे आश्वासन दिले.सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू होण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन राजेंद्र फुलावरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठाणे जिल्हाध्यक्ष भगवान भगत यांनी केले.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या कार्यकारी मंडळ सभेस महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सातशे हून अधिक पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये संघटनेचे अध्यक्ष केशवराव जाधव, माधवराव पाटील, राजाराम वरुटे ,राजेंद्र फुलावरे, राजेंद्र म्हात्रे, किसनराव घोलप, भगवान भगत, नितीन अहिरे, जीवन तेलंगे, जगदीश म्हात्रे, संदीप पाटील, सचिन जाधव, प्रमोद भोपी, निलेश साळवी, विनया जाधव, जयश्री म्हात्रे, जागृती तेलंगे, विनोद कवळे, यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## विद्यार्थ्यांनी आपले ध्येय निश्चित करावे -विलास वखारे

**कर्जत : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी दहावीचे वर्ष सुरू होण्याआधी आपल्याला करिअर कशामध्ये करायचे आहे हे निश्चित करावे आणि ते उदिष्ट गाठण्यासाठी प्रचंड कष्ट घ्यावेत, असे आवाहन प्रसिद्ध रिसर्च सायंटिस्ट विलास वखारे यांनी नेरळ येथे केले.

नेरळ आणि परिसर ग्रुप यांच्या माध्यमातून नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात रिसर्च सायंटिस्ट म्हणून प्रसिद्ध असलेले विलास वखारे हे मुंबई येथून मार्गदर्शन करण्यासाठी पाचारण करण्यात आले होते.

व्यासपीठावर नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे, मुख्याध्यापक पी बी विचवे, उप मुख्याध्यापक के बी भांडे, पर्यवेक्षक चंद्रशेखर गिरासे, नेरळ परिसर ग्रुपचे अध्यक्ष सुनील राणे, कार्याध्यक्ष मारुती गायकवाड, राजेंद्र विरले, उपाध्यक्ष विलास हजारे, मिलिंद मिसाळ, सचिव ज्ञानेश्वर भगत, राजू वाघरे, खजिनदार सुनील भागीत, सुनील मोहिते आदींसह पंढरीनाथ भागीत, यशवंत दाभणे, चिंधू बाबरे, विष्णू कालेकर, सुनील सोनावले आदी उपस्थित होते.

या वेळी परिसर ग्रुपचे सदस्य यावेळी मंगेश तरे, अनिल लदगे, नितीन राणे, संभाजी देशमुख, अरुण देशमुख, सुनील राणे, अशोक गवळी, गोविंद पेमारे, रामदास हजारे आदींनी नियोजन तसेच नेरळ विद्या मंदिरचे हनुमंत भगत, संजय शिंदे यांचे सहकार्य लाभले.



## गोंधळपाडा येथील आरोग्य शिबिरास उत्तम प्रतिसाद

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील वेश्वी ग्रामपंचायतीचेच्या हद्दीतील गोंधळपाड्यातील समाजमंदिरात शुक्रवारी (दि. २२) मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरास उत्तम प्रतिसाद मिळाला. २६० रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.

राष्ट्रीय केमिकल्स अॅण्ड फर्टिलायझरच्या सामाजिक दायित्व तसेच मेडिकल असोसिएशन रायगड व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अलिबाग यांच्या वतीने हे मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.



या शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब, मधुमेह, डोळे तपासणी, हृदयविकार निदान, इत्यादी तपासण्या करण्यात आल्या. रुग्णांना मोफत औषधोपचार तसेच इम्म्युनिटी किट व मार्गदर्शनदेखील करण्यात आले. या वेळी एमबीबीएसच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी अवयवदानावर जनजागृतीपर पथनाट्य सादर केले.

वेश्वी ग्रामपंचायतीचे सरपंच गणेश गावडे, माजी उपसरपंच नंदकुमार कदम, सदस्य उद्धव भितळे, ग्रामसेवक नितेश तेलगे, चारूहास मगर, प्रसाद गोतावडे, अमीत पुजारी, अॅड. मंगेश माळी, रायगड मेडिकल असोसिएशन चे अध्यक्ष डॉ. निशिगंध आठवले, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनवडेकर आदींच्या उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. निशिगंध आठवले, सेक्रेटरी डॉ. राजेंद्र चांदोरकर, खजिनदार डॉ. नवलकिशोर साबू, डॉ. रेखा म्हात्रे यांनी हे आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील व जनऔषधवैद्यक शास्त्राच्या विभागप्रमुख डॉ. नाझिया खान, डॉ देवदत्ता सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. डॉ.मयंक, डॉ.सायली, डॉ. प्रवीण, डॉ.मयुरी, डॉ.बलवीर, डॉ. प्रतीक आधी डॉक्टरांनी रुग्णांना तपासले. समाजसेवा अधीक्षक संतोष शेंडगे, नवनाथ अळळी, नम्रता रणसिंग, स्टाफ नर्स प्रतीक्षा घेवडे, अश्विनी कोकणी यांनीही सहकार्य केले.

## कविता व गझल शब्दात मोठी ताकद -रोहिदास पोटे

**अलिबाग : प्रतिनिधी**

कविता व गझल या स्त्रीलिंगी शब्दातदेखील फार ताकद असल्याचे प्रतिपादन लेखक, कवी व समीक्षक रोहिदास पोटे योनी केले.

पेण येथील महात्मा गांधी वाचनालय येथे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या ग्रंथालय संचालनालय महाराष्ट्र शासन, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय रायगड व महात्मा गांधी वाचनालय पेण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्रंथोत्सव-२०२४- या दोन दिवसा कार्यक्रमात अखेरच्या दिवशी गजल व कविता एक काव्यानुभव या परिसंवादात अध्यक्ष स्थानावरून रोहिदास पोटे बोलत होते. एल. बी. पाटील, सुभाष कटकदौंड, विनोद टेंबूलकर, पां. शि. पाटील, वैभव धनावडे, दिलीप मोकल, जीविता पाटील यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदविला सुत्रसंचालन मोहिनी गोरे यांनी केले.



मराठी वृतपत्रातील शब्दांचे सामर्थ्य या विषयावरील परिसंवादात प्रकाश सोनवडेकर, दत्ता म्हात्रे, विजय मांडे, विजय मोकल यांनी आपले विचार व्यक्त केले. वृत्तपत्रात योग्य शब्द, छोटी वाक्ये, साधी व सोपी वाक्य रचना जास्त महत्वाची असल्याचे मत प्रकाश सोनवडेकर, अलिबाग यांनी व्यक्त केले तर पत्रकारांमध्ये संवेदनशिलता असते.

या परिसंवादाचे सुत्रसंचलन जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांनी केले. सार्वजनिक ग्रंथालय-एक संस्था या विषयावरील परिसंवाद अरविंद गणपत वनगे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. या परिसंवादात रामदास गायकवाड, तुकाराम पवार, संजय कदम व संजय बोनदारडे यांनी सहभाग नोंदवला. २० व २१ मार्च असे दोन दिवस ग्रंथोत्सव - २०२४ साजरा करण्यात आला. यात जिल्ह्यातील वाचकांनी ग्रंथप्रदर्शन व ग्रंथ विक्रीदालनास भेट देवून ग्रंथ. खरेदी केली.

ग्रंथोत्सव-२०२४ मध्ये या वर्षी प्रथमच रायगड जिल्ह्यातील तालुका व जिल्हास्तरीय ग्रंथालयातील उत्कृष्ट वाचकांचा सन्मान चिन्ह देवून गौरव करण्यात आला. उरण येथील पांडूरंग कोळी (वय, वर्ष ८०) यांचा विशेष सन्मान करण्यात आला. माँसाहेब मिनाताई ठाकरे वाचनालय, नगरपरिषद, उरण या ग्रंथालयाचे ते आजही नियमीत वाचक आहेत. या वयातही पंधरा दिवसांनी पाच कि. मी. पायी चालत ग्रंथालयात येवून ग्रंथ बदलून नेतात.

### दुखवटा

#### विलास लचके



**माणगाव :** नगरपंचायत हद्दीतील सिद्धीनगर येथील रहिवाशी कापड व्यावसायिक कै. विलास विष्णुपंत लचके (वय ८४) यांचे रविवारी (दि.१६) निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक भाऊ व दोन बहिणी असा मोठा परिवार आहे. कै. विलास लचके यांचा दशक्रिया विधी मंगळवारी (दि.२५) तर उत्तरकार्य गुरुवारी (दि.२७) घरी गणेश अंगण सिद्धीनगर माणगाव येथे होणार आहेत.

#### म.रफी जामदार



**माणगाव :** नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव मस्जिद मोहल्ला येथील रहिवासी म.रफी जामदार (वय५०) यांचे गुरुवारी (दि.२०) अपघातात निधन झाले. माणगाव येथील कब्रस्तानात त्यांचा दफनविधी करण्यात आला. या दफनविधीला मोठा जनसमुदाय उपस्थित होता. म.रफी जामदार हे शांत, संयमी व कष्टाळू होते. ते उत्तम असे इलेक्ट्रेशन, प्लम्बिंग, एसी व फ्रीज दुरुस्तीचे काम करीत असत.

## निवडक

### गळ्यातील सोनसाखळी चोरली

**पनवेल :** श्वानाला फेरफटका मारण्यासाठी आलेल्या महिलेची लूट केल्याची घटना खारघर येथे घडली. दुचाकीवरून आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्यांच्या गळ्यातील दोन तोळे वजनाची सोनसाखळी खेचून नेली. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खारघर येथे राहणाऱ्या आशा चौगुले पाळीव श्वानाला फिरण्यास घेऊन गेल्या होत्या. सेक्टर १२ येथील बुध्दविहार समोरील पदपथावरून जात असताना दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्यांच्या गळ्यातील एक लाख वीस हजारांची सोनसाखळी हिसकावून पोबारा केला

### चेंबरमध्ये आढळला मृतदेह

**पनवेल :** करंजाडे रेल्वे पटरीच्या बाजूला असणाऱ्या चेंबरमध्ये एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ४५ ते ५० वर्षे असे आहे. या व्यक्तीबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे (८६५५३५४१११) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### स्वामी नारायण मंदिरात कार्यक्रम

**उरण :** बिएपिएस स्वामी नारायण संस्कार केंद्र उरण कुंभारवाडा रोड, वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते असे स्वामी नारायण संस्कार केंद्रचे उरण मंडळ संचालक राजेश पटेल यांनी सांगितले. सत्संग सभे साठी मोरा कोळी वाडा, उरण शहरातून भाविक येत असतात. दिवसेंदिवस भक्तांची दर्शनासाठी गर्दी वाढत आहे. सत्संग सभेसाठी भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे पुजारी अविनाश कोळी यांनी विनंती केली आहे.



# कळंबोलीत एटीएम लुटारू ताब्यात

## दोन दरोडेखोरांना पोलिसांनी पकडले रंगेहाथ

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली सेक्टर १-ई परिसरात असलेल्या ॲक्सिस बँकेच्या एटीएमवर दरोडा टाकणाऱ्या दोन दरोडेखोरांना कळंबोली पोलिसांनी रंगेहाथ पकडून ताब्यात घेतले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कळंबोलीतील सेक्टर १-ई येथील करिष्मा सोसायटीच्या तळमजल्यावर असलेल्या ॲक्सिस बँकेचया एटीएममध्ये दोन दरोडेखोरांनी प्रवेश केला. त्यानंतर त्यांनी एटीएम फोडण्याचा प्रयत्न सुरू केला. दरम्यान, एटीएममध्ये असलेल्या सुरक्षा यंत्रणेतील अलार्म वाजला.



त्याची माहिती नवी मुंबई पोलीस कंट्रोल रूमला मिळताच त्यांनी त्वरित ही माहिती कळंबोली पोलीस ठाण्याला दिली. हा माहिती कळंबोली पोलीस ठाण्याचे बीट मार्शल यांना वायरलेसवर मिळाली. त्यावर त्यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली असता एटीएमच्या गाळ्यात दोन चोरटे एटीएमचे शटर खाली करून एटीएममधील रक्कम काढत असल्याचे पोलिसांना आढळले. त्यावर पोलिसांनी या दोन्ही दरोडेखोरांना ताब्यात घेतले व त्यांना पोलीस ठाण्यात आणून त्यांच्यावर गुन्हा दाखल केला.

याप्रकरणी बोलताना कळंबोली पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी या दोघांचा खांदा कॉलनी एटीएमवर घालण्यात आलेल्या दरोड्यात सहभाग असल्याची माहिती समोर आली असून त्या दृष्टीने कळंबोली पोलीस पुढील तपास करत असल्याचे सांगितले.

# कंपनीकडे ५० हजारांची खंडणी मागितल्याप्रकरणी पाच जणांना अटक

गुन्हे

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील वावंजे परिसरात असलेल्या एका कंपनीच्या मॅनेजरकडे ५० हजाराची खंडणी मागितल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी वावंजे गावातील माजी सरपंच डी.बी.म्हात्रेंसह इतर चार जणांवर खंडणीचा गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

येथील डीलायटफुल गौरमे प्रा.लि.कंपनी वावंजे येथील कार्यालयात मॅनेजर संदीपकुमार सिंह हे असताना मा.सरपंच धनराज बाळाराम म्हात्रे उर्फ डी.बी.म्हात्रे, अमर सागडे, रोशन पाटील, प्रकाश पाटील, नाना पाटील हे त्या कंपनीमध्ये अनधिकृतपणे प्रवेश करून त्यांनी मॅनेजरकडे कंपनी चालू ठेवण्यासाठी प्रत्येक महिन्याला ५० हजार रुपयाची खंडणी मागितली व अमर सागडे यास कामावर ठेवले नाही तर बघून घेवून अशी धमकी दिली. तसेच त्यांना हाता बुक्क्याने मारहाण करून पाण्याची बाटली त्याच्या चेहऱ्यावर फेकून त्याला जखमी केले.

याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करताच वपोनि गजानन घाडगे, पो. नि.अनंत कांबळे, सपोनि सचिन पोवार, पोउपनि.हर्षल राजपूत आदींच्या पथकाने या पाचही जणांना अटक केली आहे.

# पनवेलमध्ये २९० सौरदिवे

## परिसर प्रकाशाने उजळला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रातील महामार्गांवरील बसथांबे, शौचालये, उद्यान आणि विविध स्मशानभूमी तसेच देहरंग धरणाच्या परिसरात पालिकेने सौरउर्जेवरील २९० दिवे लावल्यामुळे हा परिसर उजळून निघाला आहे. महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानंतर जिल्हा नगरोत्थान निधीतून हा खर्च करण्यात आला आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रामध्ये १७ हजार विजेचे पोल आहेत. त्यावर २४ हजार एलईडीचे वीजदिवे सुरू आहेत. २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात पनवेल पालिकेच्या वीज विभागाला जिल्हा नगरोत्थान निधीतून दोन कोटी १० लाखांचा निधी सौर उर्जेवरील दिव्यांसाठी मिळाला होता. सौर ऊर्जेवरील दिवे शहरातील महामार्गांवरील मुख्य बसथांब्यावर बसविल्यामुळे शहरातील वीज गायब झाल्यानंतर रात्रीच्या वेळीस महिला प्रवाशांना त्याचा मोठा आधार होणार आहे. तसेच महामार्गांवरील शौचालयांचा परिसरात प्रकाश कायम राहील. स्मशानभूमीत या दिव्यांचा मोठा आधार मिळू शकेल.

जिल्हा नगरोत्थान निधीतून २६० दिव्यांमध्ये सहा मीटर उंचीच्या पोलवर ४५ वॅटचे २१० दिवे आणि आठ मीटर उंचीच्या पोलवर ६० वॅटचे पन्नास दिवे लावण्यात आले. पाच वर्षांची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधित कंत्राटदार कंपनीची आहे. देहरंग धरणाचा परिसरही ४५ वॅटच्या तीस दिव्यांनी उजळला आहे.

# मालमत्ता कर भरण्याचे उरण नगर परिषदेचे आवाहन

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण नगर परिषद प्रशासनाने अनेक वर्षापासून थकीत असलेल्या मालमत्ता कर वसूल करण्याचे आदेश दिले आहेत. नगर परिषदेच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोतच रखडल्याने शहरातील अनेक विकास कामे रखडली आहेत. त्यामुळे ज्यांचे कर पन्नास हजारापेक्षा जास्त आहे, अशा मालमत्ता धारकांवर जप्तीच्या कारवाईचे आदेश दिले आहेत.

उरण नगरपरिषदेचेच्या उत्पन्नाचे स्रोत म्हणजे घरपट्टी. या घरपट्टी करावरचं नगरपरिषदेकडून नागरिकांना सोयीसुविधा पुरविल्या जातात. मात्र काही वर्षापासून मालमत्ता कर थकीत असल्याने मोठ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. अशा समस्या वारंवार उद्भवू नये यासाठी मालमता कराची वसुली करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या आहे. मालमत्ता कराचे १०० टक्के कर वसुलीचे उद्दिष्ट ठेवले असून, अधिकाऱ्यांना तसे आदेशही दिले आहे. सर्व थकबाकीदार मालमत्ताधारकांना 'जप्तीच्या नोटीसा/सुचना देण्यात आल्या असून, ज्या मिळकतधारकांची थकीत रक्कम पन्नास हजार रुपयापेक्षा जास्त आहे अशा मालमत्ता सोमवार २४ मार्चपासून सील करण्यात येणार आहे.

याकरिता उरण नगरपरिषद प्रशासनाने जमीची सर्व तयारी केलेली असून, नगरपरिषदेचा सर्व कर्मचारी वर्ग सज्ज ठेवणेत आलेला आहे. नागरिकांसाठी शनिवारी व रविवारीदेखील कर भरणा केंद्र सुरू राहणार आहे.

# उरणमध्ये चिमणी दिवस साजरा

## टाकाऊपासून टिकाऊ वस्तू बनविण्याचे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

**उरण : बातमीदार**

जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधून फ्रेंड्स ऑफ नेचर (फॉन)- सर्पमित्र निसर्ग संवर्धन संस्था चिरनेर, ता. उरण, जि. रायगड तर्फे रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, बोकडविरा व रुस्तमजी केरावाला फाउंडेशन, जेएनपी विद्यालय, शेवा येथे जागतिक चिमणी दिवस साजरा केला. जागतिक चिमणी दिना निमित्ताने चिमणीचे आपल्या परिसंस्थेतील महत्त्व शालेय विद्यार्थ्यांना समजावून सांगितले तसेच चिमण्यांसाठी टाकाऊ वस्तूंपासून घरटी कशी करता येईल यासाठी कार्यशाळादेखील आयोजित करण्यात आली होती.

वेस्टमधून बेस्ट या संकल्पनेतुन पुठ्ठयाचे रोल,आईस्क्रीम स्टिक व कार्डबोर्ड ही साधने वापरून ३७ घरट्यांचे वाटप केले.प्रात्यक्षिक दाखवून विद्यार्थ्यांकडून घरटी बनवून घेतली व ती त्यांनाच भेट दिली.



या कार्यशाळेसाठी संस्थेचे सदस्य निकेतन रमेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी ही या कार्यशाळेचा आनंद घेतला. विद्यार्थ्यांशी कार्यक्रमात अनेक गोष्टींवर चर्चा झाली.आजकाल चिमण्या दिसत नाहीत. अंगणातील झाडांवर, घरातील उंच जागा, फोटो, मीटरवर संसार थाटणाऱ्या चिमण्या गायब आहेत. चिऊ-काऊच्या गोष्टीने आपल्या बालपणातील पहिल्या गोष्टीची सुरवात होते. चिमण्या अंगणात येतील व त्यांसाठी एखादे झाड जपले पाहिजे. मानवाने जगताना निसर्गपूरक जीवनशैली कशी जपली पाहिजे. प्लास्टिक बंदी, वृक्षारोपण व संगोपन, सेंद्रिय शेती, पाणी संवर्धन, जैवविविधता संवर्धन अशा पर्यावरणीयदृष्ट्या महत्वाच्या विषयांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

जागतिक चिमणी दिवसाच्या कार्यक्रमाकरिता रा.जि. प. शाळा बोकडविराच्या मुख्याध्यापिका मिनाक्षी वरसोलकर व उपशिक्षक प्रदीप वाघवले तसेच आरकेएफ जेएनपी (इंग्रजी माध्यम) मुख्याध्यापक भूषण जाधव, शिक्षिका काजल म्हात्रे तसेच सर्व शिक्षक वृंद यांचे सहकार्य लाभले. चिमण्यांची घरटी बनविण्याकरिता रोल्स हे समीर डिजिटलचे प्रो. प्रा. संजय दादा यांनी विनामूल्य उपलब्ध केले तसेच स्टिकर्ससाठी अंबादेवी टायपिंग अँड झेरॉक्स सेंटर प्रो.प्रा.चंदन पाटील व साईगणेश सेवा केंद्र बोकडविरा प्रो. प्रा. कल्पेश घरत व प्रसाद काठे यांनी या उपक्रमास सहकार्य केले.

# 'लायन्स सरगम'च्या कराओके स्पर्धेची प्राथमिक फेरी उत्साहात

**पनवेल : वार्ताहर**

लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे आयोजित लायन्स सरगम कराओके स्टार २०२५ या कराओके गायन स्पर्धेची प्राथमिक फेरी नुकतीच गोखले सभागृह पनवेल येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या स्पर्धेचे उद्घाटन मल्टिपल काऊन्सिल चेअरमन ए के शर्मा यांनी केले.

या वेळी ए के शर्मा यांनी सर्व स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या तसेच सरगम क्लबच्या मानदा पंडित, स्वाती गोडसे आणि संजय गोडसे तसेच परीक्षक सतीश मोरे आणि ॲड. सुरेखा भुजबळ यांना सन्मानित केले. या स्पर्धेमध्ये ९० पेक्षा जास्त स्पर्धकांनी भाग घेऊन प्रचंड प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे हे स्पर्धक, पनवेल, पेण, अलिबाग, मुरुड, माणगाव, ठाणे, भिवंडी, मुंबई अशा विविध भागातून आले होते. या स्पर्धा ५ गटात घेण्यात आल्या.



अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या स्पर्धकांची आता रविवार २३ मार्च रोजी गोखले हॉल, पनवेल येथे अंतिम फेरी घेण्यात येईल. भाग घेणार्या सर्व स्पर्धकांना सरगम क्लबतर्फे चिमण्या वाचवा मोहिमेंतर्गत चिमणीचे घरटे भेट देण्यात आले. या स्पर्धांसाठी परीक्षक म्हणुन सतीश मोरे आणि ॲड. सुरेखा भुजबळ यांनी काम पाहिले. अध्यक्ष मानदा पंडित यांनी सर्वांचे स्वागत केले तर सचिव प्रेमेंद्र बहिरा यांनी आभार मानले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय गोडसे यांनी केले. या वेळी आशा शर्मा, ए एस एन मूर्ती, मदन गोवारी आदी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्वाती गोडसे, अल्केश शहा, धवल शहा, ओमकार खेडकर, आदित्य दोशी, सुषमा पन्हाळे, अश्विनी खेडकर तसेच सुयोग पेंडसे आणि सुरभी पेंडसे यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

# भेंडखळ गावात महिलांसाठी हळदीकुंकू आणि खेळ पैठणीचा

**उरण : बातमीदार**

भेंडखळ गावातील समस्त महिला भगिनींसाठी हळदीकुंकू सोहळ्या बरोबरच मनोरंजनात्मक खेळ आणि खेळ पैठणीचा अशा सुंदर कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आले होते.

ग्रामपंचायतीच्या विद्यमान सरपंच मंजिता पाटील,उपसरपंच स्वाती पाटील, विद्यमान सदस्य सोनाली ठाकूर,संगीता भगत, शीतल ठाकूर, स्वाती घरत, अक्षता ठाकूर, प्राची पाटील, तसेच ग्रामपंचायत सदस्य अजित ठाकूर, अभिजित ठाकूर, दीपक ठाकूर, लिलेश्वर भगत तसेच ग्रामपंचायत अधिकारी समिक्षा ठाकूर, क्लार्क कुमारी दीपा या सर्वांनी मिळून हळदी कुंकू समारंभ, मनोरंजनात्मक खेळ आणि खेळ पैठणीचा अशा तिहेरी कार्यक्रमाचं यशस्वी आयोजन केले होते.

गावातील सर्व महिलांनी उत्स्फूर्तपणे या सर्व खेळांमध्ये सहभागी होत कार्यक्रमाचा आनंद लुटला. या सर्व खेळांमध्ये विजयी महिलांना ग्रामपंचायतीच्या माध्यमातून आकर्षक बक्षीस देऊन त्यांचे कौतुक करण्यात आले तसेच या विजयी महिलांमध्येच पैठणी जिंकण्यासाठी खेळ रंगला. यात प्रथम आणि द्वितीय क्रमांकाच्या विजेत्या महिलांना पैठणी देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी ग्रामपंचायत भेंडखळ, सरपंच, उपसरपंच, सर्व सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, तसेच कर्मचारी वर्ग गावातील सीआरपी यामध्ये मिलन म्हात्रे, प्रीती भोईर, ज्योती ठाकूर, कल्याणी ठाकूर, प्रमिला ठाकूर तसेच महिला बचत गट वर्ग यांचे विशेष सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दर्शना माळी व उमंग भोईर या दोघांनी अत्यंत सुरेखरित्या केले.





**पनवेल : ऑल इंडिया बार एक्झामिनेशनच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेत गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सदस्य योगिता भगत उत्तीर्ण झालेल्या आहेत. याबद्दल त्यांचे गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, वामन म्हात्रे, सुहास भगत, संदीप म्हात्रे, सुदर्शन घरत, कैलास घरत आदींनी अभिनंदन केले.**

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आधुनिक तंत्रज्ञानाविषयी जनजागृती

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे शनिवारी (दि.२२) पेठपाडा गावात जाऊन डिजिटल साक्षरते विषयी जनजागृती केली.

महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विभागातील प्राध्यापक तसेच विद्यार्थी यांनी पेठपाडा गावात घरोघरी जाऊन नागरिकांना, उल्हास, उमंग दीक्षा, डीजी लॉकर व इन सी डब्ल्यू याविषयी माहिती दिली तसेच या वेगवेगळ्या अँपचा वापर धावपळीच्या जीवनामध्ये स्वतःच्या, कुटुंबाच्या व देशाच्या विकासासाठी कशा पद्धतीने करायचा याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

या उपक्रमाचा प्रमुख उद्देश पेठपाडा गावातील नागरिकांना माहिती तंत्रज्ञानाविषयी माहिती व्हावी तसेच त्यांना आजच्या आधुनिक युगामध्ये नवनवीन तंत्रज्ञानाची साधने व्यवस्थितपणे हाताळता यावीत हा होता. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी माहिती व तंत्रज्ञान विभागाने हा उपक्रम यशस्वीरित्या राबविल्याबद्दल अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. मनीषा शिलेदार व प्रा. विवेक गरजे यांनी केले तसेच प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. महेश धायगुडे, प्रा. स्नेहल भोसले, प्रा. नीलम मोरे, प्रा. हालीमा सादिया, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



# जमीर 50 ५० वर्ष

## तुम भी चलो हम भी चले, चलती रहे जिंदगी!

झूम प्रहर



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

साहिर लुधियानवी यांच्या चित्रपट गीतांमधील आशयाची, कसदारपणाची कायमच चर्चा होत असते. चित्रपटासाठीच्या गीतलेखनात पूर्वीच्या काळातील अनेकांनी उत्तम दर्जा व सातत्य कायम ठेवले. याच कारण त्यांची अफाट प्रतिभा, हिंदी व उर्दू भाषेवरील त्यांचे प्रभुत्व, गीत संगीताची जाण असलेले पटकथाकार, निर्माते, दिग्दर्शक व कलाकार, त्या काळात प्रत्येक गाण्यावर होत असलेली दीर्घकाळ सिटींग, त्या गाण्यांचे संगीताच्या ताफ्यासह होणारे पार्श्वगायन आणि त्या गाण्यांचे रूपेरी पडद्यावरील सादरीकरण अशी त्यामागची अनेक कारणे आहेत.

बी.आर. फिल्म या चित्रपट निर्मिती संस्थेचा बी.आर. चोप्रा निर्मित व रवि चोप्रा दिग्दर्शित 'जमीर'ची साहिर लुधियानवी यांची गाणी आजही पटकन ओठांवर येतात हे विशेषच. संगीत सपन चक्रवर्ती यांचे आहे. पन्नास वर्षांनंतरही जमीर म्हटलं की, त्यातील गाणी पटकन आठवतात. जिंदगी हसने गाने के लिए है दो पल (पार्श्वगायक किशोरकुमार), तुम भी चलो हम भी चले (किशोरकुमार व आशा भोसले), फुलो के देरे है (किशोरकुमार), बडे दिनों मे खुशी का दिन आया (महेंद्र कपूर) ही जमीरची गाणी सुरेल व सुरेख. याचा अर्थ त्या चित्रपटात पाहण्यासारखे फार काही नव्हते का? जमीर मुंबईत रिलीज झाला २१ मार्च १९७५ रोजी. (मेन थिएटर नाझ) त्याला पन्नास वर्ष पूर्ण होत आहेत.

१९७५ हे सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, माध्यम व क्रीडा क्षेत्रासाठी खूपच महत्त्वाचे वर्ष. जागतिक क्रिकेटमधील पहिली विश्वचषक क्रिकेट स्पर्धा याच वर्षी इंग्लंडमध्ये पार पडली.


सिनेमाच्या जगात डोकावायचे, तर १९७५ साली १० जानेवारीला पुणे शहरात रामदास फुटाणे निर्मित व डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित 'सामना' प्रदर्शित झाला. मुंबईत २४ जानेवारीला गुलशन रॉय निर्मित व यश चोप्रा दिग्दर्शित 'दीवार', १४ फेब्रुवारीला गुलजार दिग्दर्शित 'आंधी' (याच दिवशी मुंबईत 'सामना' आला), ७ मार्चला राज खोसला दिग्दर्शित 'प्रेम कहानी' असे करत करत २१ मार्च रोजी 'जमीर' आणि शक्ती सामंता दिग्दर्शित 'अमानुष' (मिनर्व्हात मॅटीनी शोला) प्रदर्शित झाले.


बी.आर. चोप्रा हे चित्रपटसृष्टीतील बरेच मोठे प्रस्थ. स्वतः चोप्रासाहेबांनी दिग्दर्शित केलेल्या अफसाना, एक ही रास्ता, नया दौर, साधना, कानून, गुमराह, हमराज, धुंद अशा चित्रपटांतून विविधता साकारली. त्यांनी दिग्दर्शित केलेला 'दास्तान' रसिकांनी नाकारला. नाउमेद न होता बी.आर. चोप्रा यांनी पती पत्नी और वो, कर्म, इन्साफ का तराजू, तवायफ इत्यादी अनेक चित्रपट दिग्दर्शित केले. त्यांचे बंधू यश चोप्रा यांचीही बी.आर. फिल्ममध्येच जडणघडण व वाढ झाली. धुल का फूल, धरमपुत्र, वक्त, आदमी और इन्सान, इत्तेफाक यानंतर यश चोप्रा यांनी आपल्या भावाच्या सावलीबाहेर पडण्याचा निर्णय घेतला. स्वतः ची यशराज फिल्म ही निर्मिती संस्था स्थापन करून 'दाग' (१९७३) पडद्यावर आणून आपली यशस्वी घोडदौड पुढे नेली. याच काळात बी.आर. चोप्रा यांचा मुलगा रवि चोप्रा याने चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकले. तोपर्यंत त्याने आपल्या पित्याच्या दिग्दर्शनात दास्तान व धुंद या तर काका यश चोप्रांकडे इत्तेफाकच्या वेळेस सहाय्यक दिग्दर्शक म्हणून उमेदवारी केली होती. ही संधी घरातूनच असली तरी महत्त्वाची होती.

'जमीर'ची गोष्ट ओ हेन्री याच्या अ डबल डाईड डिसिव्हर या लघुकथेवर आधारित असल्याचा एक संदर्भ आहे. यावरूनच राज खोसला दिग्दर्शित बम्बई का बाबू (देव आनंद व सुचित्रा सेन) होता.

'जमीर'च्या श्रेयनामावलीत पटकथा स्टोरी डिपार्टमेंट असं म्हटलयं याचे मला कायमच कुतूहल. साठच्या दशकातील अनेक चित्रपटांचे लेखक म्हणून कथा विभाग (स्टोरी डिपार्टमेंट) असे वाचायला मिळते. या विभागात किती लेखनिक असतात, ते कागदावर लिहितात की टाईप रायटर वापरतात, त्यांचे काम कसे चालते, त्यांनादेखील कामाचे तास असतात का, अकाऊंट्स विभागाप्रमाणेच हा भाग असतो काय? असे खूप प्रश्न मनात असतात हो. मी मीडियात आल्यावर कोणत्याही निर्मिती संस्थेच्या कार्यालयात गेल्यावर उगाच इकडेतिकडे नजर टाकून स्टोरी डिपार्टमेंट दिसतेय का पहायचो आणि त्यात माझं काही चुकत होते का सांगा.

याच कथा विभागाने 'जमीर'मध्ये काय दाखवलं? चित्रपट सुरू होताच पडद्यावर बंगलोर येथील अतिशय हिरवागार स्टड फार्महाऊसवर घोडे धावताना दिसताहेत आणि त्यातला एक घोडा बेशिस्तपणे वागतोय, तो उधळलाय, ते या स्टड फार्महाऊसचे मालक महाराज सिंग (शम्मी कपूर) पाहतात आणि आपण त्या घोड्यावर स्वार होत त्याला शिस्त लावण्याचे पाऊल टाकतात व त्यात ते यशस्वी ठरतात. महाराज सिंग आपली पत्नी (इंद्राणी मुखर्जी), मुलगा चिंपू व मुलगी स्मिता यांच्यासह या स्टड फार्महाऊसवर राहताहेत. त्यांच्याकडे रेसमध्ये धावणारे घोडे आहेत. अशातच एकदा डाकू मानसिंग (मदन पुरी) आपल्या टोळीसह या फार्महाऊसवर दरोडा टाकतात. त्यात महाराज सिंग यांच्याकडून मान सिंगचा मुलगा दुर्दैवाने मारला जातो म्हणून क्रोधित झालेला डाकू मानसिंग महाराज सिंगच्या मुलालाच पळवून नेतो. या धक्कादायक गोष्टीने महाराज सिंग व रुक्मिणी हवालदिल होतात.




काही वर्ष जातात आणि एके दिवशी फार्महाऊसची व्यवस्था पाहणारे रामू (रमेश देव) बादल (अमिताभ बच्चन) या युवकाला महाराज सिंगकडे घेऊन येत सांगतात, हाच तुमचा मानसिंगने पळवून नेलेला मुलगा. महाराज सिंग त्याला स्वीकारतात, पण त्यावर त्यांचा विश्वास नसल्याने ते आपली पत्नी व आता वयात आलेल्या मुलीला (सायरा बानू) ही गोष्ट सांगत नाहीत. बादल त्यांच्या मुलीच्या प्रेमात पडतो. खरंतर तो एक जेलमधून शिक्षा भोगून बाहेर पडलेला गुन्हेगार असतो. मानसिंगने पळवून नेलेला मुलगा सूरज (विनोद खन्ना) महाराज सिंगवर हल्ला करतो तेव्हा बादल त्यांना सत्य काय आहे ते सांगतो, आपका असली बेटा सूरज है (मानसिंगने त्याचे नाव बदललेले असते).

आज ओटीटीवर जगभरातील अनेक भाषेतील चित्रपट पाहत असलेल्या डिजिटल पिढीला या स्टोरीत फारसा दम वाटणार नाही. लहानपणी हिरो हरवतो वा पळवून नेला जातो आणि पिक्चरच्या क्लायमॅक्सला पिता व पुत्र (अथवा दोन भाऊ, कधी तीन भाऊ) भेटतात ही आज कदाचित भाकडकथा वाटेल, पण पन्नास वर्षांपूर्वी मसालेदार मनोरंजक पिक्चर्सचा हा हुकमी फंडा होता. यश चोप्रा दिग्दर्शित 'वक्त' (१९६५)मध्ये ते पेरले आणि पिक्चरच्या ज्युबिली हिटने ते उगवले. त्या फॉर्मुल्याला वजन दिले ते पटकथाकार सलिम जावेद यांनी (यादों की बारात, हाथ की सफाई बघा) आणि दिग्दर्शक मनमोहन देसाई यांनी (अमर अकबर ॲन्थनी). त्या काळातील सुपरहिट फॉर्मुला. जमीरमध्ये बाप बेटा अखेरीस भेटतात. पिक्चर खतम, पण इम्पॅक्ट फार नाही. तोच तर महत्त्वाचा. फर्स्ट शोपासूनच पब्लिक कौल ठीक है पिक्चर असा. (त्या काळात मेन थिएटरमधील फर्स्ट शोचा पब्लिक रिपोर्ट एक बॅरोमीटर असे. अतिशय हुकमी व विश्वासार्ह. आजच्यासारखे अमूक अमूक पिक्चरने आज किती कोटी कमावले, उद्या किती असे आकड्यांचे खेळ नसत.)

पिक्चर आस्ते कदम चालत राहिला तो त्याच्यातील गीत संगीताने. त्याचे श्रेय गीतकार साहिर लुधियानवी, संगीतकार सपन चक्रवर्ती, पार्श्वगायक आशा भोसले, किशोरकुमार व महेन्द्र कपूर यांना! तुम भी चले...

काय गंमत बघा, सुबोध मुखर्जी दिग्दर्शित 'जंगली' (१९६१)मधून शम्मी कपूरची नायिका म्हणून चित्रपटसृष्टीत आलेली सायरा बानू या चित्रपटात त्याची मुलगी होती. (चौदा वर्षांत नात्यात बदल) शम्मी कपूरने आपली उछलकूद नायक म्हणून करियर उताराला लागताच थांबणे पसंत केले. वाढते वय स्वीकारले. चित्रपट दिग्दर्शनात पाऊल टाकत इर्माला ठूस या इंग्लिश चित्रपटावरून 'मनोरंजन' (१९७४) केला (काही वर्षानंतर 'बंडलबाज' दिग्दर्शित केला. दोन्ही फ्लॉप झाल्यावर दिग्दर्शन हे आपले क्षेत्र नाही हे वेळीच स्वीकारले.) दाढीधारी रूपात तो चित्रपटसृष्टीत वावरत असतानाच फिरोझ खानने त्याला धर्मात्मा मधील आपल्या पित्याच्या भूमिकेची ऑफर देताच तो खवळला. गॉसिप्स मॅगझिन्सना खाद्य मिळाले.

'जमीर'चे छायाचित्रण धरम चोप्रा यांचे, तर संकलन प्राण मेहरा यांचे. 'जमीर'नंतर रवि चोप्रा याने तुम्हारी कसम, द बर्निंग ट्रेन, आज की आवाज, बागबान, बाबूल इत्यादी चित्रपटांचे दिग्दर्शन केले. विशेष उल्लेखनीय गोष्ट महाभारत ही मालिका. बी.आर. फिल्मचा हा सर्वोच्च बिंदू.


'बागबान'च्या चित्रनगरीतील मुहूर्ताला चोप्रा पिता व पुत्र यांना एकत्र पाहण्याचा/अनुभवण्याचा योग आला. हा चित्रपट बी.आर. चोप्रा यांचे अनेक वर्षांपासूनचे स्वप्न होते ते रवि चोप्रा यांनी रूपेरी पडद्यावर आणले... 'जमीर'ला पन्नास वर्ष पूर्ण होत असताना हा खास फोकस.

# 'महाराष्ट्र भूषण' शिल्पकार राम सुतार!









भारताचा कला व सांस्कृतिक वारसा समृद्ध करण्यात महाराष्ट्राचा मोलाचा वाटा आहे. महाराष्ट्राचं नाव विविध क्षेत्रात मोठ करणाऱ्या दिग्गजांच्या यादीत मुळचे धुळ्याचे व सध्या दिल्लीलगत नोएडा शहरात वास्तव्यास असणारे जागतिक किर्तीचे शिल्पकार पद्मभूषण राम सुतार हे नाव अढळ ताऱ्याप्रमाणे आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत घोषित केला.

राम सुतार यांचे नाव अगोदरच गुजरातमधील केवडिया कॉलनीतील लोहपुरूष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' या शिल्पांमुळे आंतरराष्ट्रीयर पातळीवर चर्चीले जात आहे. नेहमीच देश आणि विदेशातील शिल्पकलेच्या क्षेत्रात आचाट प्रयोग करणारे पद्मभूषण राम सुतार यांचा धुळे ते दिल्लीपर्यंतचा प्रवास थक्क करणारा आहे.

देश-विदेशातून भारतीय लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराला अर्थात संसदेला भेट देणाऱ्या प्रत्येक नागरीकास सुतार यांच्या कामाचे सर्वांग सुंदर व सर्वोत्तम स्वरूप पहायला मिळते ते त्यांच्या कलाकृतीमधून. संसदेच्या आवारात उभारलेल्या महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतीबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह देशाला मार्गदर्शक ठरणाऱ्या महान व्यक्तीमत्त्वांचे १६ पुतळे सुतार या मराठी शिल्पकाराने साकारले आहेत. सरासरी १६ ते १८ फुटांच्या धातूनिर्मित या पुतळ्यांनी लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराला वेगळी उंची प्रदान केली आहे. राम सुतार यांच्या शिल्पकलेतील उंचीचा हा अल्प परिचय मिळाल्यानंतर आपणास निश्चितच उत्सुकता लागली असेल या कलावंताचे महाराष्ट्रातील मूळ गांव व त्यांचा शिल्पकलेतील प्रवास जाणून घेण्याचा. वाचकांच्या मनातला नेमका हाच प्रश्न त्यांना विचारला तेव्हा ते भावूक झाले.

धुळे शहरापासून दोन ते तीन मैलावर असणाऱ्या गोंदूर या गावचा माझा जन्म. वडील वंजीहंसराज सुतार हे व्यवसायाने सुतार असल्याने कलेचा संस्कार घरातूनच आला. शेतीसाठी लागणारी अवजारे, बैलगाडी आदी वस्तू माझे वडील खूपच आखिव रेखीव पद्धतीने तयार करीत असत. त्यातूनच मला चित्र रेखाटण्याची व शिल्प साकारण्याची आवड निर्माण झाली हे सांगताना सुतार आपल्या शालेय दिवसांमधे रमल्याचा भास होत होता. शालेय जीवनात शिक्षकांनी माझ्यातील कलाकार ओळखून दिलेल्या प्रोत्साहनामुळे माझ्यातील कलाकाराची पायाभरणी झाली. गावात चौथीपर्यंत शाळा. पुढे पाचवी शिकायला म्हणून निमजाळे या गावातील शाळेत प्रवेश घेतला. सहा फूट उंचीच्या पहिलवानाचा सिमेंटचा पुतळा साकारून १९४७मध्ये सुतार यांनी आयुष्यात पहिले शिल्प तयार केले. १९२५मध्ये जन्मलेल्या राम सुतार यांनी आजतागायत शेकडो शिल्प तयार केली असून जगातील जवळपास ८० देशात उभारण्यात आलेल्या महात्मा गांधी यांच्या शिल्पासह २५० शिल्पांचा यात समावेश आहे

पुढे धुळ्यातील शिक्षक प्रशिक्षण संस्थेत सुतार जाऊ लागले. इथेच त्यांनी चित्रकलेच्या प्राथमिक परीक्षाही उत्तीर्ण केल्या. त्यांच्या उत्तम कामामुळे इथेच त्यांना चित्रकलेतून पैसेही मिळू लागले. शिक्षक प्रशिक्षण केंद्रात शिक्षकांना मॉडेल व चित्र तयार करून देण्याच्या मोबदल्यात त्यांना प्रती वस्तू पाच रुपये मिळकत मिळू लागली. आता सुतार यांना कामातही आंनद वाटू लागला. १९४८ साली शिक्षक प्रशिक्षण केंद्रातील शिक्षक श्रीरामकृष्ण जोशी यांच्याकडून महात्मा गांधी यांचे सिमेंटचे शिल्प तयार करण्याची ऑर्डर मिळाली. त्यांनी महात्मा गांधीचे चार फुटांचे सिमेंटचे शिल्प तयार केले. मोबदल्यात त्यांना १०० रुपये मिळाले. ही शिल्पातून मिळालेली त्यांची पहिली कमाई. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या व्यक्तीमत्त्वाचा मोठा प्रभाव आहे. सुतार जेमतेम दुसरीत असतानाच गांधीजींनी त्यांच्या गावाला भेट दिल्याची घटना आजही त्यांना स्मरते. परदेशी कापडांच्या होळीत सक्रीय सहभाग घेत सुतार यांनी त्या वेळी आपल्या डोक्यातील गोल मखमलीची टोपी या होळीत टाकल्याचे ते सांगतात. पुढे महात्मा गांधींचे शिल्प उभारण्याची संधीच त्यांना मोठ्या प्रमाणात मिळत गेली. सुतार यांच्या कलात्मक हातातून गुजारतमधील गांधीनगर येथे सचिवालयात उभारण्यात आलेल्या महात्मा गांधीजींच्या अलौकीक शिल्पासाठीच त्यांना पद्मश्री या मानाच्या नागरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

रामकृष्ण जोशी यांच्या मदतीने राम सुतार मुंबईला गेले व माटुंग्यात राहू लागले. १९४९मध्ये त्यांनी मुंबईतील प्रसिद्ध जे. जे. स्कूल ऑफ आर्टमधे प्रवेश घेतला. शैक्षणिक योग्यतेमुळे त्यांना थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश मिळाला व त्यांनी चार वर्षातच शिक्षण पूर्ण केले. इथेही त्यांनी चारही वर्ष प्रथम येण्याचा मान मिळवत मेयो पदक पटकाविले.

यानंतर त्यांनी जे.जे. म्हात्रे आणि करमरकर या तत्कालीन प्रसिद्ध शिल्पकारांसोबत काम केले. याच काळात केंद्रीय लोकसेवा आयोगाने वेरूळ व अंजिठा या जगप्रसिद्ध लेण्यांच्या देखभालीसाठी आर्टीस्टची परीक्षा घेतली. ही परीक्षा उत्तीर्ण करून सुतार यांनी १९५४ ते १९५८ या कालावधीत या लेण्यांतील मुर्त्यांच्या डागडूजीचे काम यशस्वीपणे केले. १९५९मध्ये त्यांनी दिल्लीस्थित केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयांतर्गत कार्यरत जाहीरात व दृष्य प्रचार संचालनालयाची (डीएव्हीपी) नोकरी स्वीकारली आणि तेव्हापासूनच ते दिल्लीत स्थायिक झाले. दिल्लीतील प्रगती मैदानावरील कृषी प्रदर्शनात सुतार यांनी उभारलेला शेतकऱ्याचा पुतळा अधिकाऱ्यांना फारच आवडला व त्यांनी लगेच सुतारांची भेट घेऊन त्यांना दोन शेतकरी जोडप्याचे दोन पुतळे बनविण्याची ऑर्डर दिली. त्यांनी शेतकरी महिला व पुरुष असे प्रत्येकी १३ फुटाचे दोन पुतळे तयार केले त्याचा मोबदला म्हणून सुतार यांना १५ हजार रुपये मिळाले. हा क्षणच त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. सरकारी नोकरीत राहून तूम्ही हे काम करू शकत नाही असे त्यांच्या डीएव्हीपीतील अधिकाऱ्याने सांगितले. सुतार यांनाही आता राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली कला दाखविण्यासाठी स्वतंत्र काम करण्याची निकड भासू लागल्याने त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला.

याच काळात तत्कालीन केंद्रीय लोकनिर्माण विभागाचे मुख्य वास्तुविशारद जोगडेकर यांना सुतार यांच्या कामाविषयी कळताच त्यांनी सुतार यांना बोलावून घेतले. केंद्र सरकातर्फे पाच फुटांचे अशोकस्तंभ उभारण्याचे काम त्यांनी सुतार यांना सोपवले. खूप अशोकस्तंभ उभारायचे होते, पण हा प्रकल्प लवकरच बंद झाला. त्यातच त्यांना भोपाळला बोलवणे आले. मध्य प्रदेश सरकारने मध्य प्रदेश व राजस्थानमधून वाहणाऱ्या चंबळ नदीवर गांधीसागर धरण बांधायला सुरुवात केली होती. या धरणासाठी दहा हजार रुपयांमधे चंबळदेवीचे ४५ फूट उंचीचे शिल्प काँक्रीटमध्ये कोरण्याचे काम त्यांनी स्वीकारले. चंबळदेवी आणि तिला कवटाळणाऱ्या मध्य प्रदेश आणि राजस्थान या दोन मुलांच्या बंधुत्वभाव व्यक्त करणारे अप्रतिम शिल्प १८ महिन्यात तयार झाले. तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरूंनी या पुतळ्याचे अनावरण केले होते. हा पुतळा बघून प्रभावित झालेल्या पंडित नेहरूंनी सुतारांना पंजाबमधील भाक्रा धरणावर श्रमिकांची शिल्पकृती उभारण्याचा मनोदय बोलून दाखवला, पण दुर्दैवाने ही शिल्पकृती पूर्ण होऊ शकली नाही आणि त्याच ठिकाणी सुतारांनी पंडित नेहरूंचा १८ फुट उंचीचा पुतळा उभारला. यानंतर संसदेच्या आवारात उभारण्यात आलेले महापुरूषांचे १६ पुतळे आणि महात्मा गांधीच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विदेशात महात्मा गांधीचे पुतळे उभरण्याचे काम करीत जवळपास ८० देशांमधे गांधीसह इतर ३५० पुतळे उभारण्याची किमया या मराठी अवलीया शिल्पकाराने केली आहे.

गुजरातमध्ये बसविण्यात आलेल्या सरदार वल्लभभाई पटेल यांच्या भव्य पुतळ्याचेही ते आणि त्यांचा मुलगा अनिल सुतार यांनी काम केले आहे. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या पुतळ्याबाबत सांगायचे झाले तर त्या पुतळ्याची प्रत्यक्ष उंची ५२२ फूट आहे. सरदारांच्या पुतळ्याची उंची नदीपात्रापासून ६०७ फूट (१८२ मीटर) आहे. एकात्मतेचे स्मारक (स्टॅच्यू ऑफ युनिटी) म्हणून नामाभिधान केलेला सरदारांचा पुतळा सरदार सरोवर धरणाजवळील साधू बेटावर उभा केला आहे.

अरबी समुद्रातील शिवस्मारक, इंदू मिलचे प्रस्तावित डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आणि गुजरातमधील सरदार वल्लभभाई पटेल यांचा १८२ मीटरचा पुतळा ही तिन्ही शिल्पे राम सुतार यांच्या कल्पनेतूनच साकारत आहेत. काही दिवसांपूर्वीच त्यांना केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाकडून देण्यात येणारा २०१६ या वर्षासाठीचा टागोर पुरस्कार जाहीर झाला. एक कोटी रुपये, प्रमाणपत्र आणि पारंपारिक हस्तकला शिल्प असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. आता महाराष्ट्र भूषण पुरस्काराने त्यांचा सन्मान होणार आहे.

सुतार यांच्या कलेचा वारसा त्यांचे एकुलते एक चिरंजीव अनिल सुतार सांभाळत आहेत. अनिल सुतार यांना लहानपणापासूनच वडिलांच्या शिल्पकलेने प्रचंड वेड लावले. मुलाची शिल्पकलेतील गती पाहता सुतार यांनी अनिल यांना शिल्पकलेच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. दिल्लीतच पदवी शिक्षण पूर्ण करून अनिल यांनी अमेरिकेतून शिल्पकलेचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. पाटण्यात महात्मा गांधीचा पुर्णाकृती पुतळा आणि कोलकाता येथील सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा उभारण्यात अनिल यांनी वडीलांसोबत सहायक शिल्पकाराची भूमिका बजावली आहे. अनिल यांनी आपल्या वडीलांना गुरूदक्षिणेच्या स्वरूपात त्यांच्या शिल्पकेलेतील प्रवासावर आधारीत दोन पुस्तकके प्रकाशित केली आहेत. मुलाच्या शिल्पकलेतील गतीबाबत सुतार संतुष्ट आहेत. या वयातही शिल्पकलेच्या माध्यमातून मातीशी संवाद साधण्याची सुतार यांची साधना अखंडपणे सुरु आहे. आपल्या प्रदीर्घ कारकीर्दीला भोवऱ्याची उपमा देताना सुतार म्हणतात, 'भोवऱ्याला जसजशी उतरण मिळेल तसतसा तो फिरत जातो, तसे माझ्या बाबतीत घडले आहे'. त्यांच्या मनात महाराष्ट्राविषयी नितांत प्रेम आहे. मनात खोलवर बिंबलेले गोंदूर (ता.धुळे) गावच्या मातीतले संस्कार घेऊनच शिल्पकलेतील हा सर्वप्रवास असल्याचे भाष्य करणाऱ्या आभाळभर किर्तीच्या पद्मविभूषण राम सुतार यांच्या कार्याला मानाचा मुजरा.

**-रणजितसिंह राजपूत,**
जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार

# खालापुरातील डोंगरावर झाडांची कत्तल

## दुर्मीळ औषधी वनस्पती नष्ट; वनविभागाने लक्ष देण्याची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

एकीकडे जागतिक वनीकरण दिवस साजरा होत असताना दुसरीकडे मात्र औषधी दुर्मिळ झाडांवर सर्रासपणे कुऱ्हाड चालवली जात असल्याचे विदारक दृश्य खालापुरात पहावयास मिळत आहे. दररोज लागणारे वणवे आणि वृक्षतोड यामुळे वन विभागाचे अस्तित्व नसल्यासारखी परिस्थिती आहे.

खालापूर शहरालगत मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्गाला खेटून ढापणी डोंगर (साबाई गड) आहे. या डोंगरावर खालापूर ग्रामस्थांचे ग्रामदैवतदेखील आहे, परंतु काही वर्षापासून या डोंगराला दृष्ट लागल्यासारखी परिस्थिती आहे. मोठ्या प्रमाणात माती उत्खनन, वृक्षतोड आणि वणवा लावण्याचे प्रमाण वाढले आहे. डोंगरावर असलेली डिंक, जांभूळ झाडाची कत्तल करण्यात आली आहे. याशिवाय रानमेवा असलेली करवंद वणव्यामध्ये होरपळून गेली आहे. कारवीच्या रानासाठी डोंगर प्रसिद्ध असून मानवनिर्मित वणव्यात कारवी देखील जळून गेली आहे. लाकूडफाटा, जळाऊ लाकडासाठी कुऱ्हाड घेऊन लाकूडतोड्यांचा वावर डोंगरावर असून हाकेच्या अंतरावर असलेल्या वनविभागाला जंगलतोड होत असल्याची खबरदेखील नसल्याने आश्चर्य आणि संताप वनप्रेमी करत आहेत.

वृक्षतोड आणि वनवा यामुळे वन्य प्राण्यांचे निवासस्थानदेखील धोक्यात आले आहे. डोंगरावर असलेला माकड आणि मोरांचा वावर जाणवत नसल्याने पर्यावरण प्रेमी निराश आहेत. वनविभागाने ॲक्शन मोडवर येऊन जंगल तोड करणाऱ्या वर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

डिंक झाडांची नोंद वन विभागाकडे असते. खालापूर ढापणी डोंगरावर डिंकाची झाडांची संख्या शेकड्यांनी होती. सतत वृक्षतोडीमुळे आता संख्या कमी होत चालली आहे.



> **पुढच्या पिढीला जंगल, डोंगर फक्त फोटोत दाखवण्याची वेळ येईल. वन विभागाकडे कर्मचारी, कायदे असताना देखील उदासीनता यामुळे पर्यावरणाची मोठी हानी होत आहे.**
> **–अनिल चाळके, माजी सरपंच, खालापूर**

# खैराच्या वाहतूकप्रकरणी ट्रकसह एक जण ताब्यात

## पोलादपूर वनउपज नाका तपासणीत कारवाई

**पोलादपूर : प्रतिनिधी**

गुप्त बातमी वरून संशयित वाहनांची तपासणी करत असताना चिपळूणच्या दिशेने जाणाऱ्या सहा लाखांच्या ट्रकमधून ८५ हजारांच्या खैराची अवैध वाहतूक होताना उघडकीस आली असून पोलादपूर वनउपज नाक्यावर एका इसमासह सर्व मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

यापुर्वीदेखील महाड राजेवाडी फाटा आणि पोलादपूर येथे अनुक्रमे खैराचा अर्क आणि खैराची सोलीव लाकडे यांची वाहतूक पकडण्यात आली असून आताच्या कारवाईमुळे खैरतस्करीचे चिपळूण कनेक्शन पुन्हा चर्चेत आले आहे. शुक्रवारी (दि.२१) रोहा उप वनसंरक्षक डॉ. शैलेंद्रकुमार जाधव, सहाय्यक वनसंरक्षक रोहित चौबे, वनक्षेत्रपाल विकास भामरे, महाडचे वनक्षेत्रपाल राकेश साहू, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलादपूर वनउपज तपासणी नाका येथे गुप्त बातमी वरून संशयित वाहनांची तपासणी सुरू असताना पोलादपूर स्टाफ तपासणी स्थानिक परिमंडळ यांना चिपळूणच्या दिशेने जाणारा ट्रक (एमएच०४जेके ६७९७) मध्ये ६.८०५ घनमीटरचे ३५४ खैर सोलीव तुकडे बिनपासी मुद्देमाल मिळाले. या मालाची अंदाजे किंमत ८५ हजार २०५ रूपये असून ट्रकची किंमत सहा लाख रूपये अंदाजे आहे.

याप्रकरणी वाहनचालक गुफरान ईरफान अहमद (रा.ऐनी हातीनसी उत्तर प्रदेश) याविरूध्द कारवाई करण्यात आली आहे. हे वाहन जप्त करण्यात आले.



# मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींचे बिगूल लवकरच?

## मतदान याद्या अद्ययावत करण्यासाठी प्रशासन लागले कामाला!

**पेण : प्रतिनिधी**

जानेवारी २०२४ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. रायगड जिल्ह्यातील ३५१ ग्रामपंचायतींच्या मतदार याद्यांचा कार्यक्रम सुरू झाला असून प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. २६ मार्चपर्यंत प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत. त्यानंतर एप्रिल महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात या ग्रामपंचायतींचे बिगुल वाजण्याची शक्यता आहे. त्यामुळे उन्हाळ्यात राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

रायगड जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींवर प्रशासकीय राज सुरु आहे. त्यामुळे ग्रामपंचायत निवडणुका कधी होणार याकडे सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष लागून असून ही उत्कंठा संपण्याच्या मार्गावर आहे. मुदत संपणाऱ्या, मागील निवडणुकांमध्ये चुकीची प्रभाग रचना झाल्याने तसेच बहिष्कार व इतर कारणांमुळे ग्रामपंचायतीच्या निवडणुका होऊ शकल्या नाहीत, अशा जिल्ह्यातील २४० ग्रामपंचायतींची सार्वत्रिक आणि १११ ग्रामपंचायतींची पोटनिवडणूक होण्याची शक्यता आहे. त्यानुसार मतदार याद्यांचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यामध्ये प्रभागनिहाय प्रारुप मतदारयादी प्रसिद्ध करणे, हरकती व सूचना दाखल करण्याचा कार्यक्रम २४ मार्चपर्यंत सुरु राहणार आहे. त्यानंतर




२६ मार्चला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. त्यानुसार जिल्ह्यातील प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे. तलाठ्यांपासून सर्वच मंडळी मतदार यादी तयार करण्याच्या कामात व्यस्त झाले आहेत. त्यानंतर एप्रिल अखेर ग्रामपंचायत निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता वर्तविले आहे. या ग्रामपंचायतींचे मतदान मेमध्ये होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

पेण तालुक्यातील एकूण १८ ग्रामपंचायतींचे निवडणूका असून यामध्ये गागोदे खुर्द, करंबेळी, कासू, अंतोरे, जावळी, पाबळ, वरेडी, बेणसे, शिहू, कुहिरे, झोतीरपाडा, वढाव, शिर्की, उंबर्डे, कांदळे, रावे, शेडाशी, जिर्णे, निधवली या ग्रामपंचायतीचा समावेश आहे. त्यामुळे पेण तालुक्यात भर उन्हाळ्यात राजकीय वातावरण तापून गाव पुढाऱ्यांची धावपळ सुरू होणार तर आरक्षणाची भिजती घोंगडी पाहता पंचायत समिती, जिल्हा परिषद या निवडणूका गणपती नंतर होण्याची दाट शक्यता आहे.

# हरेश पाटील यांची कृषी प्रशिक्षणासाठी निवड

**चौक : प्रतिनिधी**

भारतीय कृषी अनुसंशोधन केंद्र, भोपाळ येथे सात दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण करून पुन्हा राज्यात आल्यावर त्यांचे अभिनंदन होत आहे.



महाराष्ट्र राज्य कृषी विभाग आणि जागतिक बँक पुरस्कृत बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प जिल्हा यांच्या वतीने शेती उत्पादन, शेती संशोधन, नवीन जातींची निर्मिती, कमी खर्चात जास्त प्रमाणात उत्पादन, कमी खत किंवा ऑरगॅनिक पद्धतीने पीक घेणे यावर अभ्यास करून राज्यातील शेतीची जनजागृती व प्रगती करण्याचे काम केले जात आहे. आंतरराज्य आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर काम केले जात आहे. या कार्यक्रम अंतर्गत आंतर राज्य आणि आंतरराष्ट्रीय अभ्यास दौरे आयोजित करण्यात येतात. महाराष्ट्र राज्यातील आठ कृषी उत्पादन संस्था यांची निवड आंतरराज्य दौऱ्यासाठी मध्य प्रदेश येथील भोपाळ या ठिकाणी सात दिवसाचे प्रशिक्षण शिबिर प्रमाणपत्र घेण्यासाठी झाली होती.

राज्यातील आठ कृषी उत्पादक मध्य रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील माडप या गावचे आदर्श शेतकरी, माजी सरपंच हरेश नामदेव पाटील यांची निवड करण्यात आली होती. नुकताच त्यांनी सात दिवसाचे प्रशिक्षण पूर्ण करून खालापूर तालुक्यातील माडप येथे आले असून त्यांचे जोरदार स्वागत आणि अभिनंदन करण्यात आले. डायरेक्टर डॉ.सि.आर.मेहता यांच्या हस्ते त्यांना यशस्वी आणि अभ्यासपूर्वक प्रशिक्षण घेतल्याबद्दल प्रमाणपत्र देण्यात आले. हरेश नामदेव पाटील यांची यापूर्वी आंतरराष्ट्रीय पातळीवर इस्राएल येथेही निवड झाली होती.

आपला प्रशिक्षण कालावधी यशस्वी झाला असून, पाताळगंगा नदीचे वाया जाणारे पाणी परिसरातील शेतकरी यांच्या दुबार पिकासाठी कसा वापर करावा यावर चर्चा करण्यासाठी आपण प्रयत्न करणार असून जमीन विकू नका असा सल्ला देत असल्याचे सांगितले.

# कोर्लईनजीक एसटीच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रात्री साडेदहाचे सुमारास कोर्लई नजीक पेट्रोल पंपाजवळ रेवदंडा कडून मुरूडकडे जाणाऱ्या एसटीच्या ठोकरीने पायी चालत जात असलेल्या पादचाऱ्याला उडविले व बोर्ली येथील बासष्ट वर्षीय गजानन भोबू यांचा दुर्देवी मृत्यू झाला. एसटी वाहनांस मोटर सायकलस्वाराने पाठलाग करून अडविले, तेथून एस.टी. सोडून एसटीचालकांनी पोबारा केल्याचे प्रत्यक्षदर्शी पहाणारांनी सांगितले.

मुरूड तालुक्यातील कोर्लई नजीक पेट्रोल पंपाजवळ रेवदंडा–मुरूड रोडवर २१ मार्च २०२५ रोजी रात्री ठिक सव्वा दहाचे दरम्यान रेवदंडा बाजूकडून बोर्ली बाजूकडे जाणारी एसटी बस (एमएच २० बीएल ३२४२) वरील चालक याने त्याच्या ताब्यातील एसटी ही भरधाव वेगात चालवून रस्ताचे बाजूला चालणारे ६२ वर्षीय गजानन भोबू यांस पाठीमागून ठोकर मारून अपघात केला. या अपघातात गजानन भोबू यांचा दुर्देवी मृत्यू झाला, या अपघातात एसटी चालकांनी जखमीस वैद्यकिय उपचाराकरीता न नेता तेथून पळून गेला अशी तक्रार रेवदंडा पोलीस ठाणे येथे अपघातात मृत्यू पावलेले गजानन भोबू यांच्या पत्नी निलिमा गजानन भोबू यांनी नोंदविली आहे.

फिर्यादीनुसार रेवदंडा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अधिक तपास सुरू आहेत.

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी

**Hiring Audit Staff**
**Fresh/ Experienced Audit staff required for CA firm**
at Hiranandani fortune city, Apollo 206, sector A, Garden enclave, Bhokarpada, Panvel
**Contact: 8390407010**

# आमदार निरंजन डावखरेंच्या माध्यमातून ९१ शाळांना डिजिटल साहित्य वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावमध्ये २१ मार्च रोजी कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे यांच्या स्थानिक विकास निधी सन २०२४–२५ मधून रायगड जिल्ह्यातील ९१ शाळांना डिजिटल शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.



हा कार्यक्रम माणगाव शहरातील वनवासी कल्याण आश्रम दत्तनगर येथे पार पडला. या कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातील तालुके सुधागड, श्रीवर्धन, रोहा, मुरूड, माणगाव, महाड, पोलादपूर, खालापूर, उरण, अलिबाग ह्या तालुक्यातील एकूण ९१ शाळा जिल्हा परिषद शाळा, प्राथमिक पूर्ण प्राथमिक तसेच माध्यमिक शाळा विद्यालये यांना आमदार निरंजन डावखरे यांच्या पत्नी निलिमा डावखरे यांच्या हस्ते डिजीटल शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या साहित्यामध्ये संगणक संच, प्रिंटर, प्रोजेक्टर, एल ई डी शिक्षण किट आदी शैक्षणिक साहित्याचा सामावेश होता.

या कार्यक्रमावेळी निलिमाताई डावखरे, कोकण विभाग सदस्यता नोंदणी प्रमुख अभिजित पेडणेकर, महाड विधानसभा अध्यक्ष बिपीन म्हामुणकर, सरचिटणीस प्रशांत शिंदे, युवामोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष मंजुषा कुद्रीमोती, प्रदेश चिटणीस यशोधरा गोडबोले, माणगांव तालुकाध्यक्ष गोविंद कासार, श्रीवर्धन तालुकाध्यक्ष आशुतोष पाटील, महाड तालुकाध्यक्ष निलेश देवगिरीकर, म्हसळा तालुकाध्यक्ष तुकाराम पाटील, जिल्हा चिटणीस उमेशजी साटम, युवामोर्चा सरचिटणीस रोशन चाफेकर, तालुका सरचिटणीस जहेंद मुंढे, बाबुराव चव्हाण, योगेश पालकर, तालुका उपाध्यक्ष सुधीर म्हामुणकर, राजू मुंढे, किशोर पवार, सुयश मोने, शिक्षक पतपेढी अध्यक्ष सुर्वे, जंगम गुरुजी, केंद्रप्रमुख शंकर शिंदे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष रितेश निवाते, शहराध्यक्षा भारती शेठ, राजू तेटगुरे, उमेश यादव, नितीन शेलार, विधिता मेहता, सारिका मेहता, मंदार मढवी, ओमकार गायकवाड,अनिल सत्वे, राहुल धूपकर, नयन खेडेकर,अरुण पेणकर आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात निलिमा डावखरे म्हणाल्या की, भारताचे पाऊल डिजिटल इंडिया कडे जात आहे. यामध्ये कोकणातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण कसे मिळेल? याकडे कोकण पदवीधर आम निरंजन डावखरे सदैव प्रयत्नशील आहेत आणि कटिबद्ध असतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील डिजिटल इंडिया साकारण्यासाठी प्रत्येक भारतीय नागरिकांनी सक्रिय असले पाहिजे. ज्यामुळे आपण बदलणाऱ्या जागतिकीकरणात स्थिर स्थावर होऊ शकू. त्यामुळे डिजिटल इंडियाचा पाया डिजिटल शिक्षण आहे. म्हणुन कोकणातील १००% शाळा ह्या डिजिटल झाल्या पाहिजेत असा आमदार डावखरे यांचा मानस आहे. तसेच लवकरच कोकणात आणि रायगड मध्ये कौशल्य विकास केंद्र आणि कौशल्य विकास शिबिरांचे आयोजन तसेच कार्यशाळांचे आयोजनदेखील आमदार निरंजन डावखरे यांच्या माध्यमातून केले जाणार असल्याचे देखील निलिमा डावखरे यांनी उपस्थिताना ग्वाही देत सांगितले आहे.

# कर्जत–पनवेल रेल्वेचा मुद्दा लोकसभेत

**चौक : प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघात संघातील रेल्वे विकासासाठी मावळ लोकसभा खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत आवाज उठविला, त्यामुळे रेल्वेचे प्रश्न मार्गी लागतील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

कोरोना काळात दुपारी १.३० वाजता सुटणारी लोणावळा पुणे ही पूर्ववत सुरू करावी, ज्येष्ठ नागरिक यांच्या बंद केलेल्या सुविधा पुन्हा सुरू करण्यात याव्यात. मुंबई–पुणे या तिसऱ्या व चौथ्या मार्गाचे काम त्वरित सुरू करण्यात यावे. नेरळ माथेरान टॉय ट्रेन सेवेत सुधारणा करावी. ज्येष्ठ नागरिक यांच्या तिकीट कपातीचा निर्णय घेऊन पुन्हा सवलत देण्यात यावी.

पनवेल, लोणावळा, आकुर्डी, तळेगाव व चिंचवड या स्थानकाचा अमृत योजनेत समावेश करून त्यांच्या विकास कामांना प्राधान्य देण्यात यावे आणि पनवेल–कर्जत रेल्वे मार्गाचे काम जलद गतीने सुरू करून पनवेल कर्जत रेल्वे सुरू करावी त्याने या भागातील विकासाला चालना मिळेल, असे सांगितले. या मागणींचा विचार झाल्यास येथील परिसरात विकास झपाट्याने होईल.

## खोपोली अग्निशमन दलात सुसज्ज वाहन

**खालापूर :** अग्निशमन व आणीबाणी सेवेच्या बळकटी करणाकरीता महाराष्ट्र शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभागामार्फत खोपोली नगर परिषदेस अद्ययावत यंत्रणेनेसुसज्ज असे मिनी रेस्क्यू अग्निशमन वाहन प्राप्त झाले आहे. हे वाहन फोर व्हील ड्राइव्ह ट्रान्समिशन श्रेणीतील असून उच्च दाब जलप्रणाली, बचाव उपकरणे, पाणी, फोम व अग्निरोधक, रसायने, सुरक्षा उपकरणे, जलतोफ अशा अत्याधुनिक सुविधांनी युक्त असे आहे. या वाहनाच्या समावेशामुळे खोपोली नगर परिषदेच्या अग्निशमन व आणीबाणी यंत्रणेचे बळकटीकरण, सशक्तीकरण होण्यास मदत होणार असल्याचा विश्वास प्रशासक डॉ. पंकज पाटील यांनी व्यक्त केला.

**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रायगड यांचे कार्यालय**

काँग्रेस भुवन ट्रस्ट, तळ मजला, महर्षी कर्वे रोड, ता. अलिबाग, जि. रायगड
दुरध्वनी क्रमांक फॅक्स क्र. ०२१४१–२२२०१३ ई–मेल ddr_rgd@rediffmail.com

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यांस प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन, हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज मानिव अभिहस्तांतरण (डिम्ड कन्व्हेंयस बावत) जाहीर नोटीस**

अर्जदार श्री. गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सावरकर चौक, पनवेल, ता. पनवेल जि. रायगड यांनी गैरअर्जदार १) मेसर्स एम.एस. ब्रदर्स तर्फे माधव सदानंद कवळे ऑफीस न.२५ अ, शीतलादेवी मंदिर रोड, माहिम, मुंबई ४०००१६, २) श्रीम सुभद्राबाई डी. परदेशी, सावरकर चौक, पनवेल ता. पनवेल जि. रायगड ३) श्री मोहनसिंग डी परदेशी, सावरकर चौक, पनवेल ता. पनवेल जि. रायगड ४) सुधीरसिंग डी परदेशी, सावरकर चौक, पनवेल ता. पनवेल जि. रायगड ५) श्री रतन किसनसिंग परदेशी, सावरकर चौक, पनवेल ता. पनवेल जि. रायगड ६) श्रीमती वासंती डी परदेशी सावरकर चौक, पनवेल ता. पनवेल जि. रायगड७) विष्णू महादेव जोशी, राधाबाई कृष्णाजी विष्णू जोशी, श्री. विठ्ठलसिंग गणपत सिंग, सावरकर चौक, पनवेल ता. पनवेल जि. रायगड यांचेविरुध्द महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (मोफा) अधिनियमाचे कलम ११(३) अन्वये खालील मालमत्तेचे एकतर्फी मानिव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र करुन मिळणे बाबत अर्ज केला आहे.

**मालमत्तेचे वर्णननगर भूमापन क्र. ५७९/अ क्षेत्र १०६.२०, ५७९/ब क्षेत्र ९६.१० चौ.मी., ५८० क्षेत्र ५४.३०, ५८१ क्षेत्र २१.७० चौ.मी., ५८२/अ क्षेत्र ८९.५०, ५८२/ब क्षेत्र ३८.५, ५८२/१ क्षेत्र १०.००**

अर्जदाराचे अर्जाबाबत गैरअर्जदार यांना नोटीस बजावणी झाली नाही. त्यांचे पोस्टाचे पाकीट आयटम ऑन होल्ड, डोअर लॉक, इन्टीमेशन सर्व्हड असा असे शेरे घेवून परत आले आहे. सबब अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व गैरअर्जदार यांना या नोटीसद्वारे कळविण्यांत येते की, सदर मिळकतीचे अर्जदारास अभिहस्तांतरण करुन देणे संबंधीचे त्यांचे म्हणणे दिनांक ०८/०४/२०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता उपस्थित राहून मांडावे. तसेच निश्चित दिवशी व वेळी सुनावणीस आवश्यक त्या कागदपत्रांसह हजर रहावे. यात कसूर झाल्यास त्यांची काहीही म्हणणे नाही असा निष्कर्ष नोंदवून पुढील कार्यवाही करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**ठिकाण : अलिबाग**
**दिनांक : २०.०३.२०२५**

**सही/–**
**(प्र.का. जगताप)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड अलिबाग**

# उरणमध्ये पिकांची नासाडी; शेतकरी चिंतेत

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर परिसरातील पर्यावरणाचा ऱ्हास होताना दिसत आहे. प्रदुषणाचा परिणाम आंबा पिकांवर तसेच कडधान्य व भात पिकांवरही झाला आहे. हवेत धुळीकन पसरून, प्रदूषणही जास्त वाढलेले आहे. उन्हाचा तडाखा तर वाढलेलाच आहे.



वनराईने नटलेला हा निसर्ग रम्य परिसर काही वर्षातच भुईसपाट होणार आहे. त्यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होणार असल्याची भीती येथील जाणकार नागरिक व्यक्त करत आहेत. वनखात्याने याबाबत योग्य त्या हालचाली सुरू करून उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांतून जोर धरू लागली आहे. पारंपारिक पिकांपेक्षा हमखास नगदी उत्पन्न देणाऱ्या फळ पिकांकडे उरण विभागातील शेतकरी मोठ्या प्रमाणात आकर्षित होत असल्याची माहिती आंबा बागायतदार महेंद्र मोकल यांनी दिली आहे.

फळझाडांच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा स्तोत्र आर्थिक लाभ देणारा ठरत असल्याने गेल्या काही वर्षांपासून फळपीक लागवड क्षेत्र उरण तालुक्यातील चिरनेर भागात विस्तारत आहे. कोकणची माती ही फळ पिकासाठी उत्तम असल्याने पारंपारिक शेतीच्या जोडीला शेतीचे बांध, पडीक माळराने यांच्यावर फळपीक लागवड क्षेत्र वाढविण्याकडे शेतकरी वर्ग प्रयत्नशील आहे. कोकणपट्टीत फळ पिकांमध्ये सर्वोत्तम ठरलेल्या हापूससह केशर आंबा, पेरू, जांभूळ, पपई या फळझाडाला पोषक हवामान आहे.

उरण तालुक्याचा विचार केल्यास डोंगरप्रवण क्षेत्रातील सीमावर्तीय डोंगराळ भाग फळपीक लागवडीसाठी सर्वोत्तम आहे. रानसई, आक्कादेवी या धरणांना येऊन मिळणारे ओढे, नाले, झरे या नैसर्गिक पाण्याच्या स्तोत्राचा वापर या फळपीक लागवड योजनेत केल्यास आता उत्पादन देणारे एक हजार हेक्टर फळपीक वाढवून ते पाच ते दहा हजार हेक्टर पर्यंत जाऊ शकते. शेतकऱ्यांना पडीक डोंगराळ ते माळराने समूह शेतीसाठी दिल्यास मुंबईसारख्या महानगरीला थेट फळांची आवक करण्यास उरण तालुक्यातील फळपिकक्षेत्र उपयुक्त ठरणार आहे.

**पर्यावरण खात्याने लक्ष देण्याची मागणी**

वन खात्याने याबाबत योग्य त्या हालचाली सुरु करून निसर्ग वाचवण्याचा प्रयत्न करावा. निसर्ग वाचला तर येथील नागरिकांचे आयुष्यमान वाचेल. नाहीतर निसर्गाच्या कत्तलीमुळे उष्मा वाढवून उष्माघाताने अनेकांचे बळी जातील. पर्यावरण खात्याची जबाबदारी म्हणून या गंभीर बाबीकडे लक्ष देण्याची मागणी येथील नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

# औरंगजेबाच्या कबरीविरोधात बजरंग दलाचे वाशीत आंदोलन

**नवी मुंबई : बातमीदार**

हिंदुद्वेषी मुघल आक्रमक औरंगजेबाची कबर या महाराष्ट्रातून उखडून काढावी या मागणीसाठी विश्व हिंदू परिषद अंतर्गत बजरंग दल नवी मुंबईच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक, वाशी येथे तीव्र आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात विश्व हिंदू परिषद, मातृशक्ती, दुर्गा वाहिनीचे सर्व कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने शिवभक्त नागरिक उपस्थित होते.

श्री शिवरायानंतर हिंदू प्रतापसूर्य धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांचा तर अतोनात छळ या औरंग्याने केला. सुमारे ४० दिवस हा छळ चालू होता, केवळ धर्मवीर श्री संभाजी महाराजांनी इस्लाम स्वीकारावा यासाठी हा छळ होता. अतिशय धीरोदात्तपणे श्री संभाजी महाराजांनी आपले बलिदान सिद्ध केले असे म्हणत यावेळी बजरंग दलाने घोषणाबाजी केली.

विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा मंत्री स्वरूप पाटील यांनी भाषणात सांगितले की, हिंदू द्वेष्टा स्वतःच्याच बंधू बापाचा खून करणारा या देशाशी, इथल्या संस्कृतीशी, परंपरांशी कुठलीही आत्मीयता नसणारा व आमच्या धर्मवीर श्री संभाजी महाराजांची छळून हत्या करणारा औरंग्या याचे कुठलेही स्मारक कबर या भारतात असणे म्हणजे एक प्रकारे त्यांनी केलेल्या अन्यायांना प्रोत्साहन देण्यासारखे आहे.



कुठलीही परकीयांचे नामोनिशान या स्वतंत्र भारतात असू नये. स्थानिक प्रजेला अत्यंत पिडा देणारा, अन्यायी, दुराचारी राष्ट्राचा शत्रू असणारा अशा औरंग्याची कबर अजून अस्तित्वात असणे हीच एक प्रकारची मानसिक गुलामी आहे. असे बजरंग दलाचे सहसंयोजक तेजस पाटील यांनी भाषणात नमूद केले. राज्य सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आम्ही असे सूचित करू इच्छितो की, औरंग्याची कबर खणून काढावी व त्याचे कुठलेही अस्तित्व राहू देऊ नये अन्यथा बजरंग दल चलो संभाजीनगर हा नारा देत कार सेवा करेल. असा इशारा बजरंग दलाचे सहसंयोजक शंकर संगपाळ यांच्याकडून आंदोलनावेळी देण्यात आला.



**उरण : आमदार महेश बालदी यांच्या मातोश्री गंगादेवी रतनलाल बालदी यांचे नुकतेच निधन झाले. राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी आमदार महेश बालदी यांच्या निवासस्थानी भेट देऊन स्व. गंगादेवी यांना आदरांजली अर्पण केली व बालदी परिवाराचे सांत्वन केले. सोबत पदाधिकारी व कार्यकर्ते.**

# सुट्टीच्या दिवशीही कर भरणा काऊंटर्स

## मालमत्ताधारकांना पालिकेचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

नागरिकांना मालमत्ताकर भरणे सोयीचे व्हावे, यासाठी नवी मुंबई महापालिकेच्या मालमत्ताकर विभागाने विशेष सुविधा उपलब्ध करून देत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार सुट्टीच्या दिवशीही मालमत्ताकर भरणा काऊंटर्स सुरू करण्याचे जाहीर केले आहे. त्यानुसार शनिवार (दि.२२) व रविवारी (दि.२३) मालमत्ताकर भरणा काऊंटर्स सुरू राहणार आहेत.

त्यानुसार ३० मार्च २०२५ पर्यंत दररोज मालमत्ताकराची देयके नवी मुंबई महानगरपालिकेचे मुख्यालय व इतर विभागीय कार्यालयांत सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत भरण्याची सुविधा सुरू राहणार आहे. तसेच ३१ मार्च २०२५ या दिवशी रात्री १२ वाजेपर्यंत मालमत्ताकर भरणा काऊंटर्स सुरू राहणार आहेत. तरी नवी मुंबईकरांनी मालमत्ताकराची देयके भरण्यासाठी महानगरपालिकेच्या या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे यांनी केले आहे.

नवी मुंबई महापालिकेमार्फत १० ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत थकीत मालमत्ताकराच्या शास्ती रक्कमेवर ५० टक्के सूट देणारी अभय योजना जाहीर करण्यात आलेली आहे. परिणामी मालमत्ताकर भरण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभाग कार्यालयांमध्ये तसेच मुख्यालयामध्ये क्सिस बँक व आय.सी.आय.सी.आय. बँकच्या काऊंटरवर नागरिकांचा मालमत्ताकर भरण्याचा ओघ वाढला आहे. त्यामुळे सदर कालावधीमध्ये मालमत्ताकर भरण्यासाठी बँकांचे काऊंटर्स उशीरापर्यंत सुरू ठेवण्यात येणार आहेत.

या बँकांचे काऊंटर्स सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही चालू राहतील, असे नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे यांनी सूचित केले आहे.

# उरण ओएनजीसी येथे रक्तदान शिबिर

**उरण : वार्ताहर**

सालाबाद प्रमाणे ओएनजीसी उरण प्लांट यांच्या सौजन्याने व् पेट्रोलियम एम्प्लॉइज युनियन उरण आयोजित रक्तदान शिबिर शुक्रवारी (दि.२१) सकाळी ६ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत द्रोणागिरी भवन, ओएनजीसी उरण प्लांट उरण येथे आयोजित करण्यात आले होते.



या शिबिरात ७११ रक्तदात्यांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना फ्रुट व आकर्षक भेट वस्तू देण्यांत आली. या शिबिरास एम.जी.एम.हॉस्पिटल कामोठे नवी मुंबई, अपोलो हॉस्पिटल नवीमुंबई,महात्मा गांधी सेवा मुंबई. सेंट जॉर्ज हॉस्पिटल मुंबई आदी ब्लड बँकेचे सहकार्य मिळाले. या शिबारास प्रमुख पाहुणे समूह महाव्यवस्थापक-संयंत्र व्यवस्थापक उरण देवेंद्र कुमार त्रिवेदी यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी महाव्यवस्थापक प्रभारी मानव संसाधन भावना आठवले, माजी सरचिटणीस झएण मुंबई उपाध्यक्ष एन.ए.खानविलकर, सरचिटणीस पीईयु मुंबई संतोष पाटील, व्यवस्थापक गौरव पतंगे, पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन उरण प्लान्ट सेक्रेटरी समाधान मढवी, इकबाल शेख, घनश्याम घरत, विवेक पाटील, गोविंद पाटील, सेक्रेटरी उरण प्लांट व्हीलेश घरत व पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियनचे सदस्य, कार्यकर्ते आदींचे सहकार्य मिळाले, असे पेट्रोलियम एम्प्लॉईज युनियन उरण प्लांट सेक्रेटरी व्हीलेश घरत यांनी सांगितले.

# माणकेश्वर मंदिरामध्ये विशेष मुलांच्या शाळेचा अन्नपूर्णा दिवस



**उरण : बातमीदार**

स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान सी बर्ड स्पेशल स्कूल बोरी शाळेतर्फे उरण तालुक्यातील केगाव माणकेश्वर मंदिरामध्ये अन्नपूर्णा दिवस साजरा करण्यात आला. शाळेतील मुलांना अन्नपूर्ण दिवसाचे महत्व याबद्दल मुलांना मार्गदर्शन करण्यात आले व बागायती शेतीला भेट देण्यात आली.

या वेळी उपस्थित मुलांनी उरण तालुक्यातील समुद्र किनारी निसर्ग रम्य ठिकाणी असलेल्या माणकेश्वर शिव मंदिरामध्ये भजन आणि कीर्तन असे विविध कार्यक्रम करत माणकेश्वर मंदिराचे व्यवस्थापकांचे मन जिंकली. तर नंतर शाळेतील मुले, मंदिराचे ट्रस्टी व पालक वर्ग आणि शिक्षक वृंद यांनी सर्वांच्या सोबत स्नेहभोजनाचा आनंद घेतला. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचे पालक यांनीदेखील सहभाग घेतला होता. तर विद्यार्थ्यांना त्यांचे मनोबल वाढवण्यासाठी असे कार्यक्रम घेतले पाहिजे, असे मत पालकांनी मांडले. मंदिराचे विश्वस्त यांनी मंदिराला शाळेने भेट दिल्याबद्दल शाळेचे आणि मुलांचे कौतुक करून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेचा फार मोठा वाटा आहे.

या ठिकाणी असणारे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मुलांसाठी खूप चांगले नाविन्यपूर्ण कार्यक्रम करत असतात अशा शब्दात भावना व्यक्त करत शाळेला व मुलांना शुभेच्छा दिले. शेवटी आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# कोपरीत मोफत आरोग्य शिबिर

**नवी मुंबई :** परशुराम ठाकूर मित्र मंडळ आणि डी.वाय. पाटील रूग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने कोपरी गाव विभागातील नागरिकांसाठी समाजसेवक परशुराम ठाकूर यांच्या माध्यमातून २७ मार्च रोजी मोफत वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत सर्व नागरिकांचे वैद्यकीय तपासणी केली जाईल व मोफत औषधे देण्यात येतील. तसेच काही गंभीर आजार आढळल्यास डी वाय. पाटील रुग्णालयामध्ये मोफत शस्त्रक्रिया सुद्धा करण्यात येतील. कोपरी गाव विभागातून दररोज सकाळी आठ वाजता डी. वाय. पाटील. त्याचबरोबर रुग्णालयात जाण्या-येण्यासाठी मोफत बस सेवा सुरू करण्यात येणार आहे. परशुराम ठाकूर हे कायम नागरिकांच्या हितासाठी उपक्रम राबवत असतात.

# स्व. प्रभाकर कारेकरांना शिष्य परिवाराकडून मानवंदना

## नेरूळमध्ये रंगली शास्त्रीय संगीताची मैफल

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

विश्वविख्यात शास्त्रीय संगीत गायक पं. प्रभाकर कारेकर यांनी नुकताच वयाच्या ८०व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. पं. कारेकर यांचा फार मोठा शिष्य परिवार असून या शिष्य परिवाराच्या वतीने सारसोळे (नेरूळ) येथील विठाबाई कान्हा पाटील सभागृहात श्रद्धांजलीपर शास्त्रीय संगीताच्या मैफिलीचे आयोजन शुक्रवारी (दि.२१) करण्यात आले होते.




संगीताचा पिढीजात वारसा लाभलेले पं. प्रभाकर जनार्दन कारेकर यांचे शास्त्रीय संगीताबरोबरच उपशास्त्रीय संगीत व फ्युजन संगीतातही महत्त्वाचे योगदान होते. एक उत्तम गवई याबरोबरच एक आदर्श शिक्षक म्हणून त्यांची जनमानसात ख्याती होती. पं. सुरेश हळदणकर, पं. जितेंद्र अभिषेकी व पं. सी. आर. व्यास यांच्याकडे त्यांचे गुरुकुल पद्धतीत शिक्षण झाले होते. त्यांची बोलावा विठ्ठल, पहावा विठ्ठल, करिता विचार सापडेल वर्म, वक्रतुंड महाकाय, हा नाद सोड, नभ मेघांनी आक्रमिले अशी अनेक गाणी लोकप्रिय आहेत. पं. प्रभाकर कारेकर यांनी ऑरनेट कोलेमन या अमेरिकन संगीतकाराबरोबर केलेला फ्युजन अल्बम फारच लोकप्रिय झाला आहे. त्यांच्या गायनाचे परदेशातही अनेक कार्यक्रम झाले होते. त्यांना शास्त्रीय गायनातील विशेष कामगिरीबद्दल तानसेन सन्मान, संगीत नाटक अकादमी, लता मंगेशकर पुरस्कार, गोमांत विभूषण आदी पुरस्कार प्राप्त झाले होते.

या वेळी बुवांचे पट्टशिष्य, ज्येष्ठ गायक अशोकबुवा म्हात्रे यांनी भूप रागातील विलंबित एकतालातील जब ही सबनीर सोनत ही बंदिश गाऊन बुवांच्या आठवणींना उजाळा दिला. नरेंद्र चक्रवर्ती यांनी बैरागी भैरव रागातील सावरिया घर नही आवे ही बंदिश, ज्योती शंकर यांनी शुद्ध सारंग रागातील अब मोरी बात केतकी जोशी यांनी अहिरभैरव रागातील अज हुन आयो ही बंदिश व बोलावा विठ्ठल हा अभंग, जयंत गोखले यांनी कलावती रागातील पिया घर आवे ही बंदिश, सुरेखा जोशी यांनी काफी रागातील मितवा माने नही व बुवांचा लोकप्रिय अभंग कैसे करु ध्यान तर सुरेश बापट यांनी धानी रागातील हाक रे मेरे ही बंदिश गाऊन मैफिलीत रंग भरला. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वाणिज्य मासिकाचे प्रकाशन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य संघटनेतर्फे शनिवारी (दि.२२) वाणिज्य मासिकाचे प्रकाशन करण्यात आले.

या मासिकाच्या प्रकाशन सोहळ्यासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे उपस्थित होत्या तसेच त्यांच्या हस्ते वाणिज्य मासिकाचे प्रकाशन केले व त्यांनी अकाउंट फायनान्स व कॉमर्स विभागातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या मासिकासाठी महाविद्यालयातील वाणिज्य तसेच अकाउंट व फायनान्स विभागातील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व प्राध्यापकांनी वाणिज्य, अकाउंट व फायनान्स विषयांमध्ये लेख लिहून दिले होते ते सर्व लेख या मासिकात प्रसिद्ध झाले. या मासिकाचे मुख्य उद्दिष्टे विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढावी तसेच त्यांच्या ज्ञानामध्ये भर पडावी व समाजातील इतर घटकांनाही त्यांच्या ज्ञानाचा फायदा व्हावा हे होते.

महाविद्यालयातील वाणिज्य संघटनेचे समन्वयक प्रा. प्रवर शर्मा तसेच प्रा. रिजवाना मोमीन, प्रा. राजश्री म्हात्रे प्रा. विशाल देशमुख तसेच अकाउंट व फायनान्स, वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी या वेळी उपस्थित होते व त्यांच्या हस्तेही मासिकाचे प्रकाशन केले. या वाणिज्य मासिकाच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन वाणिज्य संघटनेने केले केले तसेच वाणिज्य, अकाउंट व फायनान्स विभागातील सर्व प्राध्यापक, विद्यार्थी शिक्षकेतर कर्मचारी यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.

या मासिकाचे मुख्य संपादक म्हणून प्रा. तनुजा सुमण व प्रा. योगिता पाटील यांनी महत्त्वाची भूमिका बजावली तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. मनोज यादव, प्रा. नंदिनी सकपाळ व प्रा. प्रमोद वाघे यांनी त्यांना सहकार्य केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. राहुल कांबळे यांनी केली व समारोपाच्या वेळी सर्वांचे आभार मानले.



# नेरूळ रहिवासी संघाचे विविध मागण्यांसाठी आंदोलन

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

नेरूळ रहिवासी संघ, नवी मुंबईच्या वतीने नवी मुंबई मनपा नेरूळ विभाग कार्यालयावर विविध मागण्यांसाठी शुक्रवारी (दि.२१) घंटानाद आंदोलन करण्यात आले.

नेरूळ शहर अतिक्रमण मुक्त करावे, रेल्वे स्टेशन परिसरात पहाटेपर्यंत चालू असलेले अवैध धंदे व अमली पदार्थाची विक्री आदिवर निर्बंध आणावा, महिलांच्या असुरक्षिततेचा प्रश्न, मनपा अधिकारी यांचा कामचुकारपणा आदींसाठी घंटानाद आंदोलन पुकारण्यात आले होते.

नेरूळ शहराचे सौंदर्य टिकून रहावे, शहराने मोकळा श्वास घ्यावा हा या आंदोलनाचा मुख्य उद्देश आहे. येत्या पंधरा दिवसात कारवाई करावी, अशी मागणी संघांचे स्वप्नील घोलप, विनायक पिंगळे,संजय सपकाळ, उदय साळवी ॲड. मंगल घरत, गणेश दीघे, प्रतीक यादव आदींनी केली आहे.

# चिऊताईच्या संवर्धनासाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार

**खारघर : प्रतिनिधी**

जगभरात जागतिक चिमणी दिवस म्हणून साजरा केला जातो. याच दिनाच्या औचित्यावर भारती विद्यापीठ प्रशाला व ज्युनिअर कॉलेज नवी मुंबई शाळेत जागतिक चिमणी दिनाच्या निमित्ताने वनविभाग अलिबाग वनक्षेत्रपाल पनवेल संरक्षण तसेच स्नेक अवेरनेस असोसिएशन ॲन्ड वाइल्ड लाइफ रेस्क्यू सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जागतिक चिमणी दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित केला होता.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य बेल्लम आर टी तसेच प्रमुख उपस्थिती आर एच कदम आणि प्रमुख पाहुणे वनरक्षक जगदीश राक्षे, सर्पमित्र रघुनाथ जाधव उपस्थित होते. या वेळी चिमणी तसेच इतर सामान्य पक्षी यांना शहरी वातावरण असलेल्या धोक्यांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिन साजरा करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. सर्वांचे बालपण सुखमय करणारी चिऊताई केवळ गोष्टींपुरती मर्यादित राहू नये या करिता तिचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी कटीबद्ध होऊया असा संदेश देत चिऊताईच्या संवर्धनाची जबाबदारी उपस्थित विद्यार्थ्यांनी घेतली.

वनविभाग अलिबाग आणि स्नेक अवेरनेस यांच्यातर्फे शाळेला आणि विद्यार्थ्यांना तयार केल्या चिमणीचे घरटे आणि त्यांना पाणी पिण्यासाठी मातीची भांडी भेट दिली कार्यक्रमाचे प्रास्ताविक नरेश लोहार यांनी केले कार्यक्रमाचे निवेदन प्रियांका पोळ यांनी केले व आभार मंजुषा कदम यांनी केले.

# प्रधानमंत्री आवास योजना सर्वेक्षण प्रशिक्षण

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण पहिल्या टप्प्यात केंद्र शासनाने मोठ्या प्रमाणावर घरकुल मंजूर केली होती. २०१८मध्ये 'आवास प्लस' ऑनलाइन सर्वेक्षणाद्वारे तयार केलेल्या प्रतीक्षा यादीत काही पात्र कुटुंबांचा समावेश नसल्याची बाब निदर्शनास आली होती. त्यामुळे या कुटुंबांना घरकुलाचा लाभ मिळू शकला नाही. ही अडचण लक्षात घेऊन सरकारने प्रधानमंत्री आवास योजना टप्पा २ अंतर्गत सुधारित सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.



त्यानुसार गटविकास अधिकारी व डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचे प्रशिक्षण रायगड जिल्हा परिषदेत शुक्रवारी (दि.२१) मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या उपस्थितीत झाले.

प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेसाठी शासनाने २०१२मध्ये गावनिहाय 'आवास प्लस' हे ऑनलाइन सर्वेक्षण केले होते. त्यानंतर २०१८मध्ये या सर्वेक्षणाच्या आधारे गावनिहाय लाभार्थ्यांची प्रतीक्षा यादी तयार करण्यात आली. या प्रतीक्षा यादीतील लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने घरकुलाचा लाभ दिला जात आहे. पुढील काही दिवसांत पहिला टप्पा पूर्ण होण्याची शक्यता असून सद्यस्थितीत प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ हाती घेण्यात आला आहे.

२०२८-२९पर्यंत प्रधानमंत्री आवास योजना टप्पा २ राबवली जाणार असून त्यासाठी पात्र कुटुंबांची निवड करण्यासाठी नव्याने सुधारित सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्यामुळे प्रतीक्षा यादीत नसलेल्या आणि शासनाच्या निकषांनुसार पात्र असलेल्या कुटुंबांना आता घरकुलाचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या अनुषंगाने गट विकास अधिकारी व डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचे प्रशिक्षण रायगड जिल्हा परिषदेत शुक्रवारी झाले. जिल्हा पोग्रामर जागृती पोवळे यांनी उपस्थितांना सुधारित सर्वेक्षणाबाबत माहिती दिली.

या वेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, सामान्य प्रशासन विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी जालिंदर पठारे उपस्थित होते.

# पेणमध्ये जेई लसीकरण मोहीम

**पेण : प्रतिनिधी**

राज्य आरोग्य विभागाच्या वतीने मेंदूज्वरसारख्या आजारावर प्रतिबंध म्हणून जे.ई. (जपानी एन्सेफलायटीस) लसीकरण मोहीम राबिण्यात येत असून या अनुषंगाने जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या सूचनेनुसार पेण उपजिल्हा रुग्णालयाच्या वतीने विविध शाळांमध्ये ही मोहीम राबविण्यात आली. या वेळी १ ते १५ या वयोगटातील विद्यार्थ्यांना लस देण्यात आली.



पेण एज्युकेशन सोसायटीच्या प्राथमिक शाळेत मुख्याध्यापक लेखा ठाकूर यांच्या उपस्थितीत या लसीकरण मोहिमेस प्रारंभ करण्यात आला. या वेळी सुषमा साखरे, धनाजी घरत, रुपाली जांभळे, मिलिंद वारगुडे आदी शिक्षक उपस्थित होते.

पहिली ते चौथीमधील एकूण ६६२ विद्यार्थ्यांना या वेळी मोहिमेंतर्गत लस देण्यात आली. उपजिल्हा रुग्णालयाच्या वतीने परिचारिका श्रुती चंदने, मनिष ढाकवळ, शेरॉन यांनी विद्यार्थ्यांना लस दिली.

# माथेरानमध्ये मिनीबससाठी निवारा शेड बनवावी

## प्रवाशांची मागणी

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानसह कर्जतमधील प्रवाशांसाठी परिवहन विभागाच्या वतीने मिनीबस चालवली जाते. अल्पदरात उपलब्ध असलेली मिनीबससेवा माथेरानवासीयांची जीवनवाहिनी बनली आहे, मात्र मिनीबससाठी माथेरान येथील दस्तुरी नाका येथे कोणत्याही प्रकारचा अधिकृत थांबा नाही.

उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा अशा तिन्ही ऋतूंमध्ये या ठिकाणी प्रवाशांची गैरसोय होत असून परिवहन विभागाने येथे आसन व्यवस्था असलेला निवारा शेड उभारावा, अशी मागणी माथेरानमधील स्थानिक नागरिक करीत आहेत.



माथेरानसाठी परिवहन विभागाच्या कर्जत आगारातून २००७पासून मिनीबस सेवा सुरू आहे. कर्जत डेपोतून कर्जत-नेरळ-माथेरान अशा दररोज पाच फेऱ्या सुरू आहेत. कर्जत ते माथेरान या अंतरासाठी ४० रुपये तिकिट आकारण्यात येते, तर माथेरान ते नेरळ अंतरासाठी २५ रुपये दर आकारला जातो.मिनीबससेवा सुरू झाल्यापासून माथेरानमधील नागरिकांची आणि महत्त्वाचे म्हणजे येथील शालेय विद्यार्थ्यांची अल्पदरात मोठी सोय झाली आहे. दररोज पहाटेची पहिली मिनीबस फेरी ही येथील विद्यार्थ्यांनी भरून जात असते. नेरळ, कर्जत तसेच खोपोली, बदलापूर, उल्हासनगर येथील महाविद्यालयात विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ही मिनीबस माथेरानकरांची जीवनवाहिनी बनली आहे, मात्र माथेरान दस्तुरी नाका येथे मिनीबस थांबत असलेल्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची निवारा शेड व्यवस्था शासनाने केलेली नाही तसेच येथील मिनीबस थांबासुद्धा अधिकृत करण्यात आलेला नाही. त्यामुळे येथे पर्यटकांना मिनीबस थांबा शोधावा लागतो. मिनीबस प्रवासासाठी येणाऱ्या प्रवाशांना तिन्ही ऋतूंमध्ये येथे प्रवास करताना नाहक त्रास सहन करावा लागतो.

या मिनीबसमधून ज्येष्ठ नागरिकदेखील नियमित प्रवास करीत असून निवारा शेडअभावी त्यांचीसुद्धा येथे गैरसोय होत आहे. सध्या माथेरान प्रशासनाच्या वतीने दस्तुरी नाका याठिकाणी पर्यटकांच्या सेवेसाठी मोठे अद्ययावत प्रवासी माहिती केंद्र सुरू करण्यात येणार आहे. पर्यटकांच्या सोयी सुविधांसाठी मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी येथे कायापालटदेखील करण्यात येणार आहे. यामुळे परिवहन विभागाकडून माथेरान दस्तुरी नाका येथील मिनीबस थांबा अधिकृत करून तसेच उत्तम आसन व्यवस्था असणारा निवारा शेड उभारावा अशी मागणी माथेरान मधील स्थानिकांकडून केली जात आहे.

या संदर्भात परिवहन विभागाने येथील प्रशासनासोबत विचारविनिमय करून लवकरात लवकर या ठिकाणी मिनीबस निवारा शेड उभी करावी, अशी मागणी केली जात आहे.

# मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना मेळावा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील सर्व बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, रायगड अलिबाग आणि रसायनी पातळगंगा इंडस्ट्रीज असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २७ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पातळगंगा आणि रसायनी इंडस्ट्रीज शाळा, पी १३ एमआयडीसी निवासी परिसर, मोहपाडा येथे पं. दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा व मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना उमेदवार निवड मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील नामांकित आस्थापनांकडील रिक्तपदांच्या ॲप्रेंटिसशिपची भरतीसाठी रोजगार मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात एसएससी/एचएससी, आयटीआय, डिप्लोमा इंजिनियर, पदवी इंजिनियर, व इतर पदवीधारक नोकरी इच्छुक उमेदवारांची प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे निवड केली जाणार आहे. या विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेल्या उमेदवारांना ऑनलाईन पद्धतीने अर्ज करता येईल. प्रथम https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरील Employment - Job Seeker (Find-Job)-Job Seeker Login या क्रमाने जाऊन आपल्याकडील युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपली शैक्षणिक माहीती अद्ययावत करून त्यातील Pandit Dindayal Upadhyay Job Fair या ऑप्शनमधून आपला जिल्हा निवडून जिल्ह्याच्या नावावरील Vacancy Listing-1 Agree व दिसणाऱ्या विविध पदाना आपल्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे ऑनलाईन अप्लाय करावे तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनामध्ये इंटर्शिपला अप्लाय करणेसाठी https://cmykpy.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावरील खपींशीप डेसळप ला क्लिक करुन आपल्याकडील युजर आयडी व पासवर्ड वापरुन आपली प्रोफाईल व शैक्षणिक माहिती अद्ययावत करुन Apply for Jobs ला क्लिक करुन आपला जिल्हा निवडून दिसणाऱ्या आस्थापनेच्या रिक्तपदांना Apply करावा.

रोजगार मेळाव्यातील रिक्तपदांची माहिती https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. संकेतस्थळावर ऑनलाईन अप्लाय करताना काही समस्या असल्यास या कार्यालयाचा दूरध्वनी क्रमांक ०२१४१-२२२०२९ किंवा महेश भा. वखरे, लिपिक-टंकलेखक यांचे ९४२१६१३७५७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी या रोजगार मेळाव्याचा फायदा घ्यावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मागदर्शन केंद्र, रायगड अलिबागच्या सहायक आयुक्त अ.मु. पवार यांनी केले आहे.

# खालापूर नगरपंचायतीकडून विहिरीवर पंप

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर नगरपंचायतीने शहरातील पाणीटंचाईची दखल घेत नवीन पंप बसवला. यामुळे ऐन उन्हाळ्यात खालापूर नागरिकांची पाण्यासाठी होणारी फरफट थांबणार आहे.

खालापूर नगरपंचायतीची कलोते येथील पाणीपुरवठा योजना अनेक महिने बंद असल्याने पर्यायी पाणीपुरवठा पातळगंगा नदीतून सुरू आहे, पण पंधरा दिवसांपासून पाताळगंगा नदीची पाणीपातळी कमी झाल्याने खालापुरातील पाणीपुरवठा ठप्प झाला. दैनंदिन वापराचे पाणीदेखील चार ते पाच दिवस मिळेनासे झाले. पिण्यासाठी जारमधील विकतचे



पाणी वापरावे लागत आहे, तर दैनंदिन कामासाठी लागणाऱ्या पाण्यासाठी नदी आणि विहिरीची वाट धरावी लागत आहे.

नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणीटंचाईची दखल नगरपंचायत नगराध्यक्ष रोशना मोडवे, उपनगराध्यक्ष संतोष जंगम, पाणीपुरवठा सभापती किशोर पवार, अभियंता देवेंद्र मोरखंडीकर यांनी घेत तातडीने सर्व नगरसेवकांची बैठक घेतली. त्यानुसार थेट नदीतून पाणी उचलण्यासाठी अतिरिक्त पंप आणि जलवाहिनी टाकण्यात आली आहे.

# मुरूडमध्ये शिवसृष्टीसाठी जागेची पाहणी

**मुरुड : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी काही दिवसांपूर्वी विकास आढावा बैठकीमध्ये मुरुड शहरात शिवसृष्टी निर्माण करण्यासाठी कमीत कमी १२ गुंठे जागा नगर परिषद प्रशासन अथवा शासकीय यंत्रणेने जागा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून छत्रपती शिवाजी महाराज यांचा जाज्वल्य इतिहास तरुण पिढीस मार्गदर्शक ठरेल, यासाठी आवाहन केले होते. त्यांच्या या शिवसृष्टीसाठी सर्व शासकीय यंत्रणेने उत्तम प्रतिसाद दिला आहे.



तहसीलदार रोहन शिंदे, पोलीस निरीक्षक नामदेव बंडगर, नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव व सार्वजनिक बांधकाम खात्यामधील अधिकारीवर्ग शिवसृष्टीसाठी जागेचा शोध घेत आहेत. या अनुषंगाने मुरूड शहरातील आतापर्यंत पाच जागा पाहण्यात आलेल्या असून लवकरच एका जागेची निवड करण्यात येणार आहे.

मुरूड हे पर्यटनस्थळ असल्याने येथे दरवर्षी लाखो पर्यटक येत असतात. येथे शिवसृष्टी कार्यान्वित झाल्यास पर्यटकांचा ओघ वाढण्यास मदत होणार आहे. खासदार सुनील तटकरे यांनी शिवसृष्टी निर्माण करण्याचे मनावर घेतल्याने सर्व अधिकारी जागा उपलब्ध करून देण्यासाठी परिश्रम घेत असल्याचे दिसून येत आहे.

या विषयाच्या संदर्भात तहसीलदार रोहन शिंदे यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे मुरुड तालुका अध्यक्ष फैरोज घलटे, प्रमुख नेते मनोज भगत, माजी सरपंच अजित कासार, रायगड जिल्हा सोशल मीडिया सेलचे उपाध्यक्ष हसमुख जैन, महिला तालुका अध्यक्ष ॲड. मृणाल खोत, सचिव विजय पैर, शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, मजगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच योगेंद्र गोयजी आदी मंडळी उपस्थित होती.

या वेळी मुरूड शहरातील पाच जागांची निवड व त्या बाबतची माहिती संकलित करून खासदार तटकरे यांना दाखवण्यात येऊन ते सूचित करतील ती जागा शिवसृष्टीसाठी निवड करण्यात येणार आहे.

# खोपोलीतील शारदा सुगम संगीत क्लासेसमध्ये पारितोषिक वितरण

**खोपोली : प्रतिनिधी**

यशवंत मेस्त्री संचलित संस्थेचा शारदा सुगम संगीत क्लासेसचा पारितोषिक वितरण आणि गीत गायनाचा बहारदार कार्यक्रम रोटरी क्लब हॉलमध्ये नुकताच झाला.

मेस्त्री यांचे गुरू रवींद्र कुलकर्णी, वसंत कर्णुक व ब्राह्मण सभेच्या कार्यवाह वृषाली बेलसरे यांच्या हस्ते गणेश व सरस्वती पूजन तसेच दीप प्रज्वलन करण्यात आले. दोन्ही गुरूंचा मेस्त्रींनी शाल, श्रीफळ देऊन सन्मान केला व प्रास्ताविकात क्लासबद्दल माहिती दिली.

या वेळी मेधा इनामदार, वसुधा मढवळ, सपना पित्रे, वैशाली ओक, साक्षी रानडे, किर्ती कुलकर्णी व सारिका धानोरकर या विद्यार्थिनींना प्रथमा परीक्षेत उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाल्याचे मान्यवरांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

यानंतर सर्वांनी भक्तिगीते व भावगीते सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. हार्मोनियमवर स्वतः मेस्त्री, तर तबल्यावर सूरज कदम व कणाद इनामदार यांनी साथ केली. निवेदन रवींद्र घोडके यांनी केले. या वेळी मेस्त्री यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. सर्वांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. उपस्थितांचे आभार सपना पित्रे यांनी मानले.

कार्यक्रमास संतोष घाडीगावकर, राजेंद्र पाटील, शशिकांत व अरविंद पाटणकर, श्री. ओक, श्री. पित्रे, श्री. कुलकर्णी, श्री. व सौ. सरदेशपांडे, सौ. देशपांडे, सुनीता पाटणकर, राधिका बाम, महेश इनामदार, विनायक कुलकर्णी व इतर उपस्थित होते.

✻ शारदा सुगम संगीत



# डुक्करपाडा ते ठोंबरेवाडी रस्त्याचे भूमिपूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

डुक्करपाडा ते ठोंबरेवाडी रस्त्याच्या भूमिपूजन समारंभ नुकताच शिवसेना विधानसभा प्रमुख प्रसाद थोरवे यांच्या हस्ते झाला. ग्रामीण भागातील दळणवळण सुकर व्हावे आणि नागरिकांना मूलभूत सुविधा मिळाव्यात या उद्देशाने या रस्त्याचा विकास करण्यात आला.

भूमिपूजन कार्यक्रमास दिलीप ताम्हाणे, रमेश मते, रामचंद्र मिणमिणे, भास्कर दिसले, माजी सरपंच दत्तात्रेय पिंपरकर, पंढरीनाथ आगज, संदेश सावंत, पंढरीनाथ पिंपरकर, कैलास बांगर, मनोज भोईर, मालू शेळके, भानुदास धुळे आदी उपस्थित होते.

या वेळी प्रसाद थोरवे यांनी, हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर येथील शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीमालाची वाहतूक करणे सोपे होईल, विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रवास सुलभ होईल तसेच स्थानिक व्यवसायांनाही चालना मिळेल, असे सांगून हा प्रकल्प म्हणजे गावाच्या उज्ज्वल भविष्यासाठी टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असे म्हटले.

# प्रशांत कदम यांच्यासह तांबाटी ग्रामपंचायतीचा प्रशिक्षणात सहभाग

**चौक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत आदर्श ग्रामपंचायत क्षमता बांधणी प्रशिक्षणासाठी खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रुप ग्रामपंचायतीचे अधिकारी प्रशांत कदम यांची रत्नागिरी येथील शिबिरासाठी निवड झाली होती. त्यांच्यासह ग्रामपंचायतीच्या टीमने शिबिरात सहभाग घेतला.

राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान अंतर्गत आदर्श ग्रामपंचायत क्षमता बांधणी प्रशिक्षणासाठी रायगड, ठाणे, पालघर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आदर्श ग्रामपंचायत अधिकारी व आदर्श ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली होती. हे शिबिर रत्नागिरी येथे आयोजित करण्यात आले. या शिबिरासाठी खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायत सरपंच अविनाश आमले, उपसरपंच नितीन कदम, ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम, सदस्य संतोष दळवी, बचत गट महिला रंजना राणे यांनी सहभाग घेतला.

तांबाटी ग्रामपंचायतीने माझी वसुंधरा अभियान अंतर्गत कोकण विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे. ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम यांची प्रशासनातील कार्यतत्परता पाहता रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांचे कौतुक केले.



### राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धा

# मुंबई, रायगड, नाशिक, ठाणे संघ बाद फेरीच्या दिशेने

**ठाणे : प्रतिनिधी**

मुंबई शहर पूर्व व पश्चिम, मुंबई उपनगर पश्चिम यांची महिलांमध्ये, तर रायगड, नाशिक शहर, ठाणे ग्रामीण यांची पुरुषांत ७२व्या वरिष्ठ गट पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेत बाद फेरीच्या दिशेने घोडदौड सुरू आहे.

महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनने विश्वास सामाजिक संस्था व शारदा संकल्प प्रतिष्ठान यांच्या सहकार्याने या स्पर्धेचे आयोजन केले आहे. ठाणे पश्चिम येथील कॅडबरी कंपनीजवळील भारतरत्न माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी क्रीडांगणावर स्पर्धा खेळली जात आहे.

तिसऱ्या दिवशी झालेल्या महिलांच्या ग गटात मुंबई शहर पश्चिमने ठाणे शहरचा ४०-२२ असा पाडाव करीत





बाद फेरीचा आपला मार्ग मोकळा केला. आक्रमक सुरुवात करीत मुंबईने पूर्वार्धात दोन लोण देत २७-१४ अशी आश्वासक आघाडी घेतली. उत्तरार्धात त्याच जोशाने खेळत आपला विजय सोपा केला. श्रद्धा कदमने एकाच चढाईत चार गडी टिपत या विजयात महत्त्वाचा खेळ केला. तिला पूजा यादवची चढाईत, तर पौर्णिमा जेधेची उत्कृष्ट साथ लाभली. ठाण्याची माधुरी गवंडी एकाकी लढली.

मुंबई शहर पूर्वने फ गटातील चुरशीच्या लढतीत पालघरचा ५४-४० असा पाडाव केला. पहिल्या डावात दोन लोण देत ३२-२० अशी आघाडी घेणाऱ्या मुंबईला दुसऱ्या डावात उत्तम लढत दिली. साक्षी सावंत, सौंदर्या रामस्वामी यांच्या उत्कृष्ट चढाया त्यांना तनु, मेघा कदम यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे मुंबईने हे साध्य केले. मोक्षा पुजारी, ज्युली मिस्किटा, शाहीन शेख यांचा खेळ पालघरला विजयी करण्यात थोडा कमी पडला. मुंबई उपनगर पश्चिमने महिलांच्या ह गटात सांगलीचा ३६-२१ असा पराभव केला. उपनगरने पहिला लोण देत विश्रांतीपर्यंत २०-११ अशी आघाडी घेतली. नंतर आणखी एक लोण देत आपला विजय निश्चित केला. कोमल देवकर, करीना कामतेकर यांनी उपनगरकडून, तर श्रद्धा माळी, किरण तोडकर यांनी सांगलीकडून चढाई पकडीचा उत्कृष्ट केला.

पुरुषांच्या क गटात रायगडाने यजमान ठाणे शहरचा ३३-२९ असा पराभव करीत बाद फेरीतील आपला प्रवेश निश्चित केला. या पराभवाने ठाण्याचा बाद फेरी गाठण्याचा मार्ग खडतर झाला. पार्थ ठाकूर, मिथुन मोकल यांच्या चढाई पकडीच्या धूर्त खेळीने हा विजय साकारला. सुरज धुंदले, अभिजित मोईल यांचा खेळ ठाण्याला विजयी करण्यात कमी पडला.

नाशिक शहरने पुरुषांच्या अ गटात बीडला ४७-२९ असे नमवित बाद फेरीतील आपला सहभाग निश्चित केला. आंतरराष्ट्रीय खेळाडू आकाश शिंदे, शाकिब सय्यद, प्रसाद माटे यांच्या चतुरस्त्र खेळाने नाशिकने १८ गुणांच्या फरकाने सामना जिंकला. बीडच्या शंकर मेघाने, रोहन केंकणे यांनी कडवी लढत दिली. पुरुषांच्या ब गटात ठाणे ग्रामीणने नांदेडचा ५५-२६ असा पाडाव करीत बाद फेरीच्या दृष्टीने आगेकूच केली. ठाणे संघाने आक्रमक सुरुवात करून पहिल्या डावात दोन लोण देत २८-११ अशी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात त्याच जोशाने खेळत सामना एकतर्फी केला. मंगेश सोनवणे, धीरज तरे यांच्या चढाईच्या खेळाला अतुल देसले, उमेश म्हात्रे यांची मिळालेली पकडीची साथ याने ठाण्याने हा विजय सोपा केला.

## राष्ट्रीय तायक्वान्दो पंच सेमिनार व परीक्षेसाठी सुभाष पाटील परीक्षक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तायक्वॅान्डो फेडरेशन ऑफ इंडिया व मध्य प्रदेश तायक्वान्दो असोसिएशनमार्फत विदीशा (मध्य प्रदेश) येथे २७ ते २९ मार्चदरम्यान राष्ट्रीय पंच सेमिनार व राष्ट्रीय पंच परीक्षा होणार आहे यासाठी परीक्षक म्हणून रायगडचे सुपुत्र, तायक्वांदो आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच कॉमनवेल्थ तायक्वांदो रेफरी युनियनचे सदस्य सुभाष पाटील यांची निवड झाली आहे.



सुभाष पाटील हे सातवी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याचबरोबर अनेक देशात जाऊन सेमिनार केले आहेत. ते प्रथम श्रेणीचे आंतरराष्ट्रीय पंच आहेत

पाटील २६ मार्च रोजी विदीशा येथे रवाना होणार आहेत. त्यांना परीक्षकपदी निवडीबद्दल सेमिनार तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, रायगड तायक्वांदो असोसिएशनचे पदाधिकारी, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आदी मान्यवरांकडून शुभेच्छा देण्यात आल्या.

## आमदार प्रवीण दरेकर यांच्या हस्ते आनंदवाडी प्रीमियर लीगचे उद्घाटन



**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील कोतवाल बुद्रुक आनंदवाडी ग्रामस्थांच्या वतीने होळी सणाच्या निमित्ताने आनंदवाडी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन विधान परिषदेतील भाजप गटनेते आमदार प्रवीण दरेकर यांच्या हस्ते झाले.

क्रिकेट स्पर्धेसाठी आमदार दरेकर यांच्या येण्याने सर्व सभासद, ग्रामस्थांमध्ये उत्साह आला. या वेळी आमदार दरेकर यांनी गावातील तरुण हा भावी पिढीचा एक कणा आहे, असे सांगून आपण कायम कोतवाल गावाच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली.

या वेळी रामचंद्रमहाराज शिंदे आणि संतोष बर्गे यांचे मार्गदर्शनही उपस्थितांना मिळाले. उद्घाटन सोहळ्यास संतोष शिंदे, जानू ढेबे, राजू ढेबे, विकास बर्गे व इतर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत महाराष्ट्राचा डंका

### अॅथलेटिक्समध्ये चैतन्य, साहिल, सिद्धीला 'सुवर्ण', मीनाक्षीला रौप्यपदक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अपेक्षेप्रमाणे महाराष्ट्राच्या पॅरा खेळाडूंनी तीन सुवर्णांसह एक रौप्यपदक जिंकून खेलो इंडिया पॅरा स्पर्धेतील अॅथलेटिक्सचे मैदान गाजवले. १०० मीटर शर्यतीत अकोलाच्या चैतन्य पाठकसह गोळाफेकीत कराडच्या साहिल सय्यद, पुण्याच्या सिद्धी क्षीरसागरने सुवर्ण यशाला गवसणी घातली. चैतन्य हा रिक्षाचालकाचा मुलगा असून बारावीच्या परीक्षेला दांडी मारून त्याने खेलो इंडिया स्पर्धेची पात्रता फेरीतही यश संपादन केले होते.

जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये सुरू असलेल्या दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत जय महाराष्ट्राचा सूर निनादला. अकोला शहरातील रिक्षाचालकाचा मुलगा असणार्या चैतन्य विजय पाठकने १०० मीटर धावणे टी १३ प्रकारात 'सुवर्ण'धाव घेतली. ११.५९ सेकंदात शर्यत पुर्ण करीत चैतन्यने पदार्पणातच सुवर्णपदकाचा करिष्मा घडविला. ३५ टक्के डोळ्याने अधू असलेल्या चैतन्यने महिन्याभरापूर्वीच राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण यश संपादून खेलो इंडिया स्पर्धेची पात्रता फेरी गाठली होती. या स्पर्धेमुळे बारावीच्या समाजशास्त्रच्या पेपरला दांडी मारून त्याने सुवर्ण यशाला गवसणी घातली होती.



चैतन्यचे वडील विजय पाठक हे अकोल्यात प्रवासी रिक्षा चालवितात, तर आई स्वच्छता कर्मचारी आहे. मातीवर सराव करणाऱ्या चैतन्यने करून ट्रॅकवर आपली हुकुमत सिद्ध केली. अकोल्यात रवि भटकर यांच्या मार्गदर्शनखाली तो कसून सराव करीत असतो.

क्रिकेटपटू ते गोळाफेकपटू असा प्रवास करणाऱ्या कराडच्या साहिल सय्यदने एफ ६४ गोळाफेकीत सुवर्णपदकाचा पल्ला पार केला. वैयक्तिक चौथ्या फेरीत ९.५७ मीटरची सर्वोत्तम फेकी करून कराडच्या साईलने सोनेरी यशाचे शिखर गाठले. २६ वर्षीय साईल व्हिलचेअर क्रिकेटमध्ये अनेक वर्ष रमला होता. दोन वर्षापासून त्याने गोळाफेक व थाळीफेक स्पर्धे कडे लक्ष दिले. पुण्यातील सणस मैदानात प्रशिक्षिका सोनिया शिंदे यांच्या मार्गदर्शनाव्दारे वर्षभरातच त्याने राष्ट्रीय स्पर्धेत पदकाची जादू घडविला. पाठोपाठ आता पर्दापणातच खेलो इंडिया स्पर्धेतही सुवर्ण यश संपादन केले.

अॅथलेटिक्समध्ये महिलांच्या गोळाफेक एफ ५६ प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी सुवर्णसह रौप्यपदक पटकावले. पुण्याची सिद्धी क्षीरसागर सुवर्णपदकाची मानकरी ठरली. हजारो प्रेक्षकांच्या साक्षीने पुण्याच्या २० वर्षीय सिद्धीने अंतिम फेरीत ५.८८ मीटर गोळाफेक करीत अव्वल स्थान पटकावले. ५.६३ मीटर गोळा फेकणारी महाराष्ट्राचीच मीनाक्षी जाधव रौप्यपदकाची मानकरी ठरली. तमिळनाडूच्या लिझी वेलू हिने (४.९५ मीटर) कांस्यपदक मिळवले.

२०१६मध्ये विषाणूजन्य आजारामुळे पाठीखालील भाग अधू झाल्यावरही हार न मानता सिद्धीने वडील विकास क्षीरसागर यांच्या पाठिंब्याच्या जोरावर आयुष्याशी दोन हात करण्याची जिगर दाखवली. यंदा फेब्रुवारीमध्ये झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेत तिने कांस्यपदक मिळवले. या आधारावर तिने वर्ल्ड चॅम्पियनशिपसाठी पात्रता मिळवली.

मूळची फलटणची पण आता वाशीत स्थायिक असलेल्या ३४ वर्षीय मीनाक्षीला आपल्या वाटचालीत कमला रहेजा (शरण) पॅराप्लेजिक सेंटरचे सर्वतोपरी सहकार्य लाभले.

## माजी हेवीवेट चॅम्पियन जॉर्ज फोरमन यांचे निधन


**टेक्सास : वृत्तसंस्था**



अमेरिकेतील मुष्टीयोद्धा (बॉक्सर) जॉर्ज फोरमन यांचे शुक्रवारी निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. त्यांच्या कुटुंबियांनी सोशल मीडियावर याची माहिती दिली. बॉक्सिंग इतिहासातील सर्वात वयस्कर हेवीवेट विजेतेपदाचा मान त्यांनी मिळवला होता.

फोरमन यांच्या कुटुंबीयांनी निवेदनात म्हटले आहे की, आमचे लाडके जॉर्ज एडवर्ड फोरमन सीनियर यांच्या निधनाची घोषणा अत्यंत दुःखाने करत आहोत. २१ मार्च रोजी त्यांनी आम्हाला निरोप दिला. फोरमन निर्भय व स्पष्टवक्ते होते. त्यांनी त्यांच्या कारकीर्दीत ८१ बॉक्सिंग सामने लढले. यापैकी ७६ जिंकले. केवळ पाच सामन्यांमध्ये त्यांचा पराभव झाला. १९६८च्या मेक्सिको ऑलिम्पिकमध्ये त्यांनी हेवीवेट विभागात सुवर्णपदकही जिंकले होते.

## आयपीएलसाठी रोहित शर्माचा सराव



**मुंबई** : आयपीएल २०२५साठी मुंबई इंडियन्सचा सर्वोत्कृष्ट कर्णधार राहिलेला रोहित शर्मा संघात दाखल झाला आहे. तो सध्या मुंबईचा कर्णधार नसला तरी टी-२० विश्वचषक आणि चॅम्पियन्स ट्रॉफीच्या विजयानंतर आता हिटमॅन आयपीएलच्या १८व्या हंगामासाठी सज्ज झाला आहे. मुंबई इंडियन्सचा सलामीचा सामना २३ मार्चला चेन्नई सुपर किंग्सविरूद्ध होणार आहे. यापूर्वी संघ सराव करतानाचे व्हिडीओ पहायला मिळाले. मुंबई इंडियन्सने रोहित शर्माचा व्हिडीओ शेअर केला आहे.



**पनवेल : राजधानी दिल्लीत खेळल्या जात असलेल्या खेलो इंडिया पॅरा स्पर्धेत कळंबोलीतील प्रवीण जगताप पॉवरलिफ्टिंग खेळात ८० किलो गटामध्ये चौथ्या क्रमांकावर राहिला. या कामगिरीबद्दल त्याचे भाजप कळंबोली शहराध्यक्ष रविनाथ पाटील यांनी कौतुक केले. सोबत इतर पदाधिकारी व कार्यकर्ते.**

## 'चॅम्पियन्स ट्रॉफी'ला मिळाली विक्रमी प्रेक्षकसंख्या

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेने भारतात प्रेक्षकसंख्येचे नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत. विशेषतः भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील उपांत्य फेरीचा सामना प्रचंड लोकप्रिय ठरला. त्या सामन्याने भारत-विरुद्ध पाकिस्तान सामन्यांच्या पूर्वीच्या प्रेक्षकसंख्येचे विक्रम मोडीत काढले.



या स्पर्धेतील टीम इंडियाच्या उल्लेखनीय कामगिरीमुळे देशभरातील क्रिकेट चाहत्यांचा उत्साह वाढला, ज्यामुळे प्रेक्षकसंख्या आणि टीव्ही रेटिंग्समध्ये लक्षणीय वाढ दिसून आली. या स्पर्धेची टीव्ही रेटिंग कोणत्याही मल्टी-नेशनल क्रिकेट स्पर्धेसाठी आतापर्यंतची सर्वात जास्त झाली आहे. यामुळे आयसीसी पुरुष क्रिकेट विश्वचषक २०२३ची विक्रमी प्रेक्षकसंख्याही मागे पडली आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफीने २०२३च्या विश्वचषक स्पर्धेपेक्षा २३% चांगली कामगिरी केली. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या थेट प्रक्षेपणाला स्टार स्पोर्ट्सवर १३७ अब्ज मिनिटे आणि जिओ हॉटस्टारवर ११० अब्ज मिनिटे वेळ मिळाला. भारत आणि न्यूझीलंड यांच्यात झालेल्या थरारक अंतिम सामन्याचा टीव्हीवर १२.२ कोटी आणि जिओ हॉटस्टारवर ६.१ कोटी प्रेक्षकांनी आनंद घेतला.

या स्पर्धेत भारतात सर्वाधिक पाहिलेला सामना भारत विरुद्ध पाकिस्तान होता. या वेळी हा सामना टीव्हीवर २६ अब्ज मिनिटांपेक्षा जास्त काळ पाहिला गेला, तर २०२३च्या विश्वचषकातील भारत-पाकिस्तान सामना १९.५ अब्ज मिनिटे पाहिला गेला होता. या सामन्याला १०.८%पेक्षा जास्त टेलिव्हिजन रेटिंग मिळाले.

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५च्या अंतिम सामन्याने क्रिकेटमध्ये डिजिटल प्रेक्षकसंख्येचा नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. हा सामना टीव्ही इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक रेटिंग असलेला वनडे सामना ठरला (आयसीसी क्रिकेट विश्वचषक सामन्यांव्यतिरिक्त). या सामन्याचे थेट प्रक्षेपण २३ कोटी लोकांनी पाहिले, तर एकूण ५३ अब्ज मिनिटे टीव्ही आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर पाहिले गेले.

## नॅशनल मेरीटाइम गेम्सचा आज शुभारंभ

**नवी मुंबई : बातमीदार**

भारताच्या क्रीडा आणि समुद्री क्षेत्रासाठी ऐतिहासिक ठरणाऱ्या एका विशेष कार्यक्रमात नॅशनल मेरीटाइम गेम्स २०२५चा भव्य शुभारंभ रविवारी (दि. २३) सायंकाळी ५ वाजता आयएमइ, पाम बीच रोड, नवी मुंबई येथे होणार आहे.

या समारंभाचे वैशिष्ट्य म्हणजे भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्ष आणि खासदार डॉ. पी. टी. उषा यांच्या हस्ते या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे.

डॉ. पी. टी. उषा २४ मार्च रोजी सकाळी ९ वाजता उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स येथे जलतरण आणि टेबल टेनिस स्पर्धांचे उद्घाटन करणार आहेत.

नॅशनल मेरीटाइम गेम्स २०२५ डायरेक्टोरेट जनरल ऑफ शिपिंग यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पीएसए पोर्ट अथॉरिटी यांच्या सहकार्याने आयोजित केले गेले असून कुशलता, शिस्त आणि ऐक्याचे प्रतीक ठरले आहेत.

या स्पर्धांमध्ये अॅथलेटिक्स, बॅडमिंटन, कॅरम, क्रिकेट, बुद्धिबळ, गोल्फ, फुटसल, पिकलबॉल, इनडोअर रोइंग, जलतरण, टेबल टेनिस यांसारख्या २०पेक्षा अधिक खेळांचा समावेश आहे.

या खेळांसाठी डीजी शिपिंग, पीएसए, मुंबई पोर्ट ट्रस्ट, शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, मेरीटाइम ट्रेनिंग ट्रस्ट आणि जेएनपीटी यांच्यासह अनेक प्रतिष्ठित नेत्यांची उपस्थिती राहणार असून समुद्री क्षेत्रातील एकात्मता आणि प्रेरणेला ते उजाळा देणार आहेत. नॅशनल मेरीटाइम गेम्स २०२५ हे केवळ खेळांचे नव्हे, तर भारताच्या समुद्ररक्षकांच्या ताकदी, धैर्य आणि आत्म्याचा उत्सव आहे.

## हसन नवाजने मोडला बाबर आझमचा रेकॉर्ड

**ऑकलंड : वृत्तसंस्था**

पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेतील तिसऱ्या सामन्यात पाकिस्तानी संघाने न्यूझीलंडवर दणदणीत विजय मिळवला आहे. या सामन्यात यजमान न्यूझीलंडच्या संघाने दिलेलं २०५ धावांचे आव्हान पाकिस्तानने हसन नवाजने ठोकलेल्या तुफानी शतकाच्या जोरावर अवघ्या एका गड्याच्या मोबदल्यात पार केले. त्याने बाबर आझमचा विक्रम मोडीत काढला.

मागच्या काही काळापासून सातत्याने अपयशी ठरत असलेल्या पाकिस्तानी क्रिकेटला आजच्या सामन्यामधून हसन नवाज याच्या रूपात एक नवा स्टार सापडला. या सामन्यात न्यूझीलंडने दिलेल्या २०५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना हसन नवाज



याने पाकिस्तानच्या संघाला तुफानी सुरुवात करून दिली. टी-२० कारकिर्दीतील आपला केवळ तिसरा सामना खेळत असलेल्या नवाजने अवघ्या ४५ चेंडून १० चौकार आणि सात षटकारांसह नाबाग १०५ दावा कुटून काढत पाकिस्तानला अवघ्या सोळाव्या षटकातच विजय मिळवून दिला.

या दरम्यान नवाजने केवळ ४४ चेंडूत आपलं शतक पूर्ण केले. त्याबरोबरच नवाज याने टी-२० क्रिकेटमध्ये पाकिस्तानसाठी सर्वात वेगवान शतक ठोकण्याचा विक्रम आपल्या नावे केला. त्याने २०२१मध्ये बाबर आझम याने दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ४९ चेंडूत ठोकलेल्या शतकाचा विक्रम मोडीत काढला.

या विजयासह पाकिस्ताने पाच टी-२० सामन्यांच्या मालिकेतील पिछाडी १-२ अशी कमी केली आहे. या मालिकेतील पुढील सामना २३ मार्च रोजी माऊंड माऊंगानुई येथे खेळवला जाणार आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com